- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

सोने-चांदी
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : गुरूवार, २७ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २५७ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# नेपाळमध्ये महाप्रलय

## ९५ जणांचा मृत्यू, १०५ भारतीय बेपत्ता



**वृत्तसंस्था, नेपाळ**

नेपाळमध्ये आलेल्या महाप्रलयामुळं मोठं नुकसान झालं आहे. महाप्रलयामुळं आतापर्यंत ९५ लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर, जवळपास ५०० लोक बेपत्ता असल्याची माहिती आहे, यामध्ये १०५ भारतीयांचा समावेश आहे. भारताच्या विदेश मंत्रालयानं नेपाळमध्ये अचानक आलेल्या महापुरामुळं प्रभावित झालेल्या भारतीय नागरिकच्या थेट बचाव कायार्साठी तातडीनं बचाव कार्य आणि मदत पोहोचवण्यासाठी काठमांडू येथील भारतीय उच्चायुक्त नेपाळ सरकारसोबत सातत्यानं समन्वय करत आहे.

विदेश मंत्रालयाच्या माहितीनुसार बेपत्ता असलेल्या १०५ भारतीय नागरिकांची आणि ३७ अनिवासी भारतीयांची माहिती ज्यांना घ्यायची आहे, त्यांच्यासाठी आपातकालीन फोन नंबर जारी करण्यात आले होते. नेपाळमधील भारतीय उच्चायुक्तानं केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं की नेपाळमध्ये आज अचानक आलेल्या पुरामुळं अडकलेल्या भारतीय नागरिकांच्या थेट बचावासाठी आणि मदत पोहोचवण्यासाठी नेपाळ सरकारच्या संबंधित अधिकाऱ्यांसोबत ते संपर्कात आहेत. नेपाळ सरकारसोबत समन्वय साधत बचाव कार्य केलं जात असल्याचं सांगण्यात आलं आहे.

**भारतानं मदत पाठवली**

विदेश मंत्री एस. जयशंकर यांनी म्हटलं की नेपाळमध्ये आलेल्या विनाशकारी पुराचा सामना करण्यासाठी भारतानं १० टन आपत्ती मदत कार्य साहित्य आणि आवश्यक औषधं पाठवली आहेत. महाप्रलयामुळं ज्यांचा मृत्यू झाला त्यांच्या कुटुंबीयांप्रती आमच्या संवेदना आहेत. संकटकाळात भारत नेपाळ आणि त्यांच्या नागरिकांसोबत असल्याचं जयशंकर म्हणाले.

भारतानं नेपाळला शक्य तितकी मदत करण्याचा शब्द दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांच्यासोबत चर्चा केली आहे. नेपाळला आवश्यक असलेली मदत करण्यास तयार असल्याचं नेपाळच्या पंतप्रधानांना सांगण्यात आलं आहे. नेपाळच्या भाऊ आणि बहिणींसोबत भारत ठामपणे उभा आहे. आमच्या टीम बचाव आणि मदत कार्यात मदत करत असल्याचं मोदी म्हणाले.

**बिहार आणि उत्तर प्रदेशात सतर्कता**

नेपाळमध्ये अचानक आलेल्या महाप्रलयामुळं भारतात सतर्कता बाळगण्यात आली आहे. बिहारचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी एक उच्चस्तरीय समिती बनवली आहे. पश्चिम चम्पारण्य, पूर्व चम्पारण्य, गोपालगंज, सारण, मुजफ्फरपूर आणि वैशाली सारख्या जिल्ह्यांना सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### बिहार सरकार सतर्क, गंडक बॅरेजचे ३६ दरवाजे उघडले

**पाटणा** : नेपाळमधील महाप्रलयाची स्थिती पाहता बिहार सरकार सतर्क झालं आहे. नेपाळमधून येणाऱ्या पाण्यामुळं बिहारमध्ये गंडक नदीच्या पाणी पातळीमध्ये अचानक वाढ होण्याची शक्यता आहे. हे संकट लक्षात घेता बिहार सरकार सतर्क झालं आहे. वाल्मिकीनगर येथील गंडक बॅरेजचे सर्व ३६ दरवाजे उघडण्यात आले आहेत. विभागाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार गंडक बॅरेजवर मुख्यालय स्तरावरुन अधीक्षक अभियंता यांच्या नेतृत्त्वात एक तांत्रिक पथ तैनात करण्यासाठी पाठवण्यात आलं आहे. गंडक नदीच्या खोऱ्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये सतर्कतेचा इशारा जारी करण्यात आला आहे. पूरस्थितीसारखी परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा सामना करण्यासाठी साहित्याचा साठा, नदी किनाऱ्यावर निरीक्षणावर लक्ष ठेवलं जात आहे. दुपारी बारा वाजेपर्यंत गंडक बॅरेजमधून ८६ हजार क्यूसेक पाणी सोडण्यात आलं आहे. नेपाळ भागात नारायणी नदीची देवघाट गेज स्थळावरील पाणी पातळी ४.७७ मीटर इतकी आहे.

थोडक्यात

### पाकमध्ये १५ नवजात बाळांचा मृत्यू

**इस्लामाबाद** : पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद येथे बुधवारी सकाळी रुग्णालयाच्या स्त्रीरोग विभागात भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना घडली. या दुर्घटनेत तब्बल १५ नवजात बालकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. ही घटना पाकिस्तान इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस रुग्णालयात घडली.

स्थानिक माध्यमांच्या माहितीनुसार, आग लागली तेव्हा रुग्णालयातील नवजात बालकांच्या कक्षात एकूण १६ बाळे होती. आग आणि धुरामुळे परिस्थिती अत्यंत गंभीर बनली. बचाव पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मात्र, या दुर्घटनेत केवळ एका नवजात बालकाला सुरक्षितपणे बाहेर काढण्यात यश आले, तर १५ बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. प्राथमिक माहितीनुसार, नवजात बालकांच्या कक्षातील एअर कंडिशनरच्या कॉम्प्रेसरचा स्फोट झाल्यानंतर आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. स्फोटानंतर काही क्षणांतच आगीने परिसराला वेढल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे रुग्णालयातील कर्मचाऱ्यांमध्ये आणि रुग्णांच्या नातेवाईकांमध्ये मोठी धावपळ उडाली. सकाळी साधारण ७ वाजण्याच्या सुमारास स्त्रीरोग विभागात आग लागली. घटनेची माहिती मिळताच बचाव पथके आणि अग्निशमन दलाचे जवान रुग्णालयात दाखल झाले. आग नियंत्रणात आणण्यासोबतच विभागातील रुग्ण आणि कर्मचाऱ्यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याचे काम करण्यात आले. आग विझविल्यानंतर परिसरात कुलिंग ऑपरेशनही करण्यात आले.

# सरकारची डोकेदुखी वाढणार; ओबीसींचा महामोर्चा काढण्याचा निर्णय

**वृत्तसंस्था, मुंबई**

जनगणनेत ओबीसींचा स्वतंत्र कॉलम असावा या मागणीसाठी महाराष्ट्रात छत्रपती संभाजीनगर येथे राज्यस्तरीय भव्य ओबीसी मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले आहे.

सकल ओबीसी महामोर्चाच्या वतीने मंगळवारी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे राज्यव्यापी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. या बैठकीला विजय वडेट्टीवार यांच्यासह खासदार डॉ. प्रशांत पडोळे, माजी मंत्री महादेव जानकर, कुणबी समाजाचे नेते चंद्रकांत बावकर, सकल ओबीसी महामोर्चाचे मुख्य संयोजक उमेश कोराम आदी मान्यवर उपस्थित होते.

केंद्र सरकारकडून सुरू असलेल्या जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी स्वतंत्र नोंद असताना ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम ठेवण्यात आलेला नाही. ओबीसींची अचूक लोकसंख्या समोर यावी आणि त्यानुसार सामाजिक न्यायाची धोरणे आखली जावीत, यासाठी जातिनिहाय जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम असलाच पाहिजे. या मागणीसाठी ओबीसी समाजातील सर्व संघटना, नेते आणि कार्यकर्त्यांनी एकजुटीने व्यापक लढा उभारण्याचा निर्धार केला आहे, अशी माहिती काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी दिली.

मराठवाड्यासह राज्यातील विविध भागांतील ओबीसी नेत्यांची बैठक घेऊन या मोर्चाची तारीख आणि पुढील नियोजन निश्चित केले जाणार आहे. या आंदोलनाच्या नियोजनासाठी सात सदस्यांची समिती स्थापन करण्यात येणार असून सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील ओबीसी नेते, खासदार व आमदार यांच्याशी संपर्क साधून त्यांना आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले जाणार आहे. ओबीसी मंत्री आणि ओबीसी लोकप्रतिनिधींनीही केंद्र सरकारपर्यंत समाजाच्या भावना पोहोचवाव्यात, यासाठी



पंतप्रधान मोदी यांना पत्र लिहिण्याचे आवाहनही करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रात ओबीसींच्या सहाशे जाती असताना आकडेवारीत लाखो नोंदींचे आकडे कसे आले, हा गंभीर प्रश्न आहे. ओबीसींची खरी संख्या कळणार नसेल तर त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात धोरणे, आरक्षण आणि योजनांचा लाभ कसा मिळणार, असा प्रश्न वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

# बॉयफ्रेंडच्या हल्ल्यात महिला अधिकारी ठार

**वृत्तसंस्था, पुणे**

बॉयफ्रेंडने कोयत्याने केलेल्या हल्ल्यामुळे बड्या सरकारी महिला अधिकाऱ्याचा मृत्यू झाला आहे. ही धक्कादायक घटना पालघर येथे घडली आहे. समोर येत असलेल्या माहितीनुसार, २७ वर्षीय स्नेहल सावंत या पालघर जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल अधिकारी म्हणून कार्यरत होत्या.

पण गेल्या तीन महिन्यांपासून मत्यूशी झुंज देत होत्या आणि त्यांची मृत्यूशी झुंज अखेर अपयशी ठरली आहे. सुरुवातीला त्यांच्यावर बोईसर येथील रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यानंतर त्यांना पुण्यातील रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण उपचार सुरू असताना मंगळवारी संध्याकाळी त्यांचा मृत्यू झाला.

स्नेहल सावंत यांच्या निधनानंतर आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे. समोर येत असलेल्या माहितीनुसार, १२ जून २०२६ रोजी सायंकाळी पालघर शहरातील गोल्ड सिनेमा परिसरात अमोल मुळे याने स्नेहल सावंत यांच्यावर कोयत्याने हल्ला केला होता. या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या होत्या.

# गोधनी गॅस दुर्घटनेत बाधित रुग्णांच्या उपचाराच्या खर्चाची पूर्तता महाराष्ट्र शासनामार्फत होणार

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी संबंधित खाजगी रुग्णालयाच्या प्रमुखांची बैठक घेवून रुग्णांकडून पैसे न घेण्याचे दिले आदेश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

गोधनी ग्रामपंचायत परिसरातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जलशुध्दीकरण केंद्रामध्ये क्लोरीन गॅस गळतीने बाधित झालेल्या रुग्णांच्या उपचाराचा खर्च महाराष्ट्र शासनामार्फत केला जाणार आहे. गळतीमुळे विविध खाजगी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांच्या उपचारावरील खर्च व देयके याबाबत एकसमान कार्यपद्धती निश्चित करण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी संबंधित रुग्णालयांच्या व्यवस्थापन प्रतिनिधींची बैठक घेवून त्यांना निर्देश दिले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घटनेची माहिती मिळताच तातडीने त्यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना सर्व उपाययोजना व वैद्यकीय मदत करण्याचे निर्देश दिले होते.

दिनांक २४ ऑगस्टच्या पहाटे गोधनी जलशुध्दीकरण केंद्रामध्ये असलेल्या क्लोरीन गॅसच्या दोन सिलेंडरपैकी एका सिलेंडरमधून गॅसची गळती झाली होती. यात जवळपास ५९ व्यक्ती उपचार घेत आहेत. खाजगी रूग्णालयात मॅक्स हॉस्पिटल, स्पर्श हॉस्पिटल, विवेका हॉस्पिटल, सिनर्जी हॉस्पिटल, ऑलराईट हॉस्पिटल, किंग्सवे हॉस्पिटल आदींचा समावेश आहे.

बाधित रुग्णांचे वैद्यकीय उपचार, तपासण्या, औषधोपचार व उपचारासंबंधित आवश्यक खर्चाची देयके महाराष्ट्र शासनामार्फत अदा करण्यात येणार आहेत. त्यामुळे सदर घटनेतील बाधित कोणत्याही रुग्णाकडून अथवा त्यांच्या नातेवाईकांकडून उपचाराच्या खचापोटी कोणतीही रक्कम वसूल करू नये, असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी रुग्णालय प्रशासनास स्पष्ट सांगितले.

# अमरावतीतील नवजात बालकांच्या मृत्यूने हळहळ

## भाजपची दहीहंडी रद्द, पीडित कुटुंबीयांना मदत करण्याचा निर्णय, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून अमरावती भाजपच्या निर्णयाचे स्वागत

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशू अतिदक्षता विभागात लागलेल्या आगीत तीन नवजात बालकांचा मृत्यू, तर सहा बालके जखमी झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेने अमरावतीसह संपूर्ण राज्यात हळहळ व्यक्त होत आहे.





या पार्श्वभूमीवर भाजप, अमरावतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेली दहीहंडी रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दुर्दैवी घटनेमुळे वातावरण दुःखद असताना जल्लोष करणे उचित ठरणार नाही, अशी भूमिका अमरावती भाजपने घेतली आहे. दहीहंडी कार्यक्रमावर होणारा खर्च पीडित कुटुंबीयांना मदतीसाठी देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अमरावती भाजपच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. दहीहंडी कार्यक्रमाऐवजी पीडित कुटुंबीयांना मदत करण्याचा निर्णय संवेदनशील आहे. या दुर्दैवी घटनेतील सर्व पीडित आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी आम्ही सर्वजण आहोत, असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

नवजात बालकांच्या मृत्यूची घटना हृदय पिळवटून टाकणारी असून, या घटनेने आपण सर्वच जण दुःखी आणि अस्वस्थ असल्याची भावना बावनकुळे यांनी व्यक्त केली. दुःखाच्या या प्रसंगी पीडित कुटुंबीयांना आधार देणे आणि त्यांच्या पाठीशी उभे राहणे हीच आपली सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

संपादकीय लेखणीतून...

# गडचिरोली जिल्हा

गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती २६ आगस्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून झाली. संपूर्ण गडचिरोली जिल्हा हा पूर्वी चंद्रपूर जिल्ह्यामध्ये समाविष्ट होता व मुख्यतः गडचिरोली, सिरोंचा ही ठिकाणे चंद्रपूर जिल्ह्यामध्ये तहसील म्हणून कार्यरत होती. गडचिरोली जिल्ह्याचे एकुण क्षेत्रफळ १४४१२ चौ.कि.मी.आहे. चंद्रपूर व ब्रम्हपुरी मधील जमिनदारी व मालमत्तेचे हस्तांतरण करून गडचिरोली तहसील म्हणून १९०५ पासून अस्तित्वात होती. ब्रम्हपुरी ऐवजी गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती २६ आगस्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून करण्यात आली आहे. गडचिरोली जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ या प्रदेशात मोडतो. फार प्राचीन काळी ह्या प्रदेशावर राष्ट्रकुट यांचे राज्य होते. त्यानंतर चालुक्य, देवगीरीचे यादव यांचे साम्राज्य होते. यानंतर गडचिरोलीच्या गोंड राजांनी राज्य केले. तेराव्या शतकात, खन्डक्या बल्लाळ शाह यांनी चंद्रपूरची स्थापना केली. त्यांनी आपली राजधानी सिरपूर येथून चंद्रपूर येथे हलविली. याचकाळात चंद्रपूर प्रदेश हा मराठ्याच्या सत्तेखाली आला. सन १८५३ मध्ये, बेरार हा चंद्रपूर (पूर्वीचे चांदा ) प्रदेशाचा भाग ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनी च्या ताब्यात आला. सन १८५४ मध्ये चंद्रपूर हा बेरार या प्रदेशाचा स्वतंत्र जिल्हा म्हणून अस्तित्वात आला. ब्रिटीशांनी सन १९०५ मध्ये चंद्रपूर व ब्राम्हपुरीची जमिनदारी व मालमत्ता हस्तांतरण करून गडचिरोली तहसीलची निर्मिती केली. राज्याची पुनर्ररचना होण्यापुर्वी हा भाग सन १९५६ पर्यंत केंद्रीय अधिपत्याखाली होता. त्यानंतर राज्य पुनर्रचनेनुसार चंद्रपूर बॉम्बे स्टेट मध्ये समाविष्ट करण्यात आले. सन १९६० मध्ये केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्याची स्थापना करून त्यामध्ये चंद्रपूर हे जिल्हा म्हणून समाविष्ट करण्यात आले. सन १९८२ मध्ये चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून ब्रम्हपुरी ऐवजी स्वतंत्र गडचिरोली जिल्हा अस्तित्वात आला.

गडचिरोली जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या उत्तर-पूर्व दिशेला वसलेला असून तेलंगणा व छत्तीसगड राज्याच्या सीमा लागून आहेत. गडचिरोली जिल्हा हा पूर्णपणे नक्सल प्रभावित जिल्हा म्हणून ओळखला जातो. गडचिरोली जिल्हा जवळपास ७६ % जंगलाने व्यापलेला असल्याने घनदाट जंगलात नक्सल समर्थित लोक आश्रय घेतात. सन २०११ च्या जनगणने नुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १०७२९४२ असून पुरुष व स्त्रिया यांची लोकसंख्या अनुक्रमे ५४१३२८, ५३१६१४ याप्रमाणे आहे जिल्ह्यात अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्या अनुक्रमे १२०७४५ व ४१५३०६ एवढी आहे. जिल्ह्याची एकूण साक्षरता ७४.४ टक्के आहे. जिल्ह्यामध्ये अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्येची टक्केवारी ११.२५ % व ३८.७ % अनुक्रमे आहे.

गडचिरोली जिल्हा हा मुख्यत्वे महाराष्ट्र राज्यात आदिवासी, मागासलेला व घनदाट जंगलाने व्याप्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. हा जिल्हा अतिदुर्गम, डोंगर दऱ्याने व्याप्त व अविकसित असून जास्तीत जास्त क्षेत्र जंगलाने वेढलेला आहे. जिल्ह्याच्या एकूण जमिनीच्या क्षेत्रापैकी जवळपास ७६ % टक्के भाग जंगलाने व्याप्त आहे. हा जिल्हा बांबुचे झाड व तेंदूची पाने यांकरीता प्रसिद्ध आहे. भात हे जिल्ह्याचे मुख्य पिक आहे. याव्यतिरिक्त तूर, गहू, ज्वारी, सोयाबीन, जवस इत्यादी कृषी उत्पादने घेतली जातात. जिल्ह्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. जिल्ह्यात चामोर्शी तालुक्यामध्ये आष्टी येथे पेपर मिल चा कारखाना असून इतर कोणतेही मोठे उद्योगधंदे नाहित. यामुळे, जिल्हा हा आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे. जिल्ह्यात भाताचे उत्पादन जास्त होत असल्याने भात गिरणींची संख्या जास्त आहे. जिल्ह्यात कोसाचे उत्पादन होत असून कोसा उत्पादन केंद्र आरमोरी येथे आहे. जिल्ह्यात फक्त १८.५ कि.मी. लांबीचा रेल्वे मार्ग असून देसाईगंज येथे रेल्वेची सुविधा आहे. सद्या इतरत्र रेल्वे लाईन टाकण्याची प्रक्रिया युद्धपातळीवर सुरू आहे.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये मुख्यतः गोंडी, माडिया, मराठी, हिंदी, तेलगु, बंगाली, छत्तीसगडी इत्यादी भाषा बोलल्या जातात. गडचिरोली जिल्ह्यामध्ये शासनाने प्रशासकीयदृष्ट्या एकूण सहा उपविभाग- गडचिरोली, वडसा, अहेरी, चामोर्शी, एटापल्ली, कुरखेडा निर्माण केले असुन प्रत्येक उपविभागात दोन तालुके सामाविष्ट करण्यात आलेले आहेत. जिल्ह्यात एकूण १२ तालुके आहेत. जिल्ह्यात ४५७ ग्रामपंचायती असून १६८८ राजस्व गावे अस्तित्वात आहेत. जिल्ह्यामध्ये तीन विधानसभा व एक लोकसभा क्षेत्र- चंद्रपूर जिल्ह्याचा काही भाग मिळून अहे. सद्या १२ पंचायत समीती आहेत. जिल्ह्यात ९ नगर पंचायती असून गडचिरोली, देसाईगंज (वडसा) व आरमोरी या शहरात नगरपालिका आहेत.

गोदावरी नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहत असून तिचे पात्र जिल्ह्याच्या सीमेला लागून असून दक्षिण भागाला जिल्हा वसलेला आहे. गोदावरी नदीच्या उपनद्या जसे प्राणहिता (वैनगंगा व वर्धा या उपनद्या मिळून) व इंद्रावती ह्या मुख्य नद्या जिल्ह्याच्या सीमा भागात वाहतात. जिल्ह्याचे पूर्वेत्तर भागात, धानोरा, एटापल्ली, अहेरी व सिरोंचा तालुके असून घनदाट जंगलाने व्याप्त आहे. जिल्ह्याच्या भामरागड, टिपागड, पलसगड व सुरजागड भागात उंच टेकड्या आहेत. नामांकित कंपन्या तेथील खनिज माल उत्खनन करून काढण्याच्या प्रयत्नात आहेत. शेतकऱ्यांच्या सुपीक जमीनी हडपून उद्योगधंदे आणि कारखाने स्थापन करण्याची त्यांच्यात होड लागलेल्या दिसून येत आहेत.

# विद्यार्थ्यांच्या ढासळता संयम चिंताजनक



लीलाधर दवंडे
कामठी (नागपूर)

गेल्या आठवड्यात काळीज हेलावून टाकणारी घटना छत्रपती संभाजी नगरच्या खावड्या डोंगरावर घडली. पोलिसांसह अनेक जण या दुर्दैवी घटनेचे प्रत्यक्ष साक्षीदार असल्याचे प्रथमदर्शनी व्हिडिओतून दिसून येते. निव्वळ महागडा मोबाईल मिळावा म्हणून रुसलेल्या कुणाल चंदगुडे या तरुणाने खावड्या डोंगरावरून उडी घेतली आणि त्याला वाचविण्याच्या प्रयत्नात वडील मुरलीधर चंदगुडे यांचाही तोल जाऊन मुलासोबत तेही उंचीवरून खाली पडले. स्वतःचं कुटुंब संपण्याचा हा सर्व प्रकार स्वतःच्या डोळ्यांनी बघणाऱ्या संगीता चंदगुडे या माऊलीने सहन न झाल्याने त्याच डोंगरावरून उडी घेऊन आत्महत्या केली. अवघ्या एका क्षणात होत्याचे नव्हते झाले आणि फक्त एका मोबाईलच्या अट्टाहासामुळे अख्खे कुटुंब हरवल्या गेले. शेवटी काय साध्य झालं यातून? या प्रश्नाचं उत्तर शोधतो म्हटले तर निव्वळ शून्य.

महागड्या मोबाईलसाठी एखाद्या विद्यार्थ्याने आत्महत्या करावी हे काही पहिले प्रकरण नाही. याही पूर्वी आई वडिलांनी रागवल्याचा राग मनात धरून आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत. अमूक अमूक महागडी वस्तू घेऊन न दिल्याने घरून पलायन करणारे विद्यार्थी, प्रसंगी स्वतःच्या जीवाचा नाश करणारे तरुण- तरुणी हे सर्व बघितलं की, खरेच आपण सुशिक्षित होत आहोत, यावर विश्वासच बसेनासा होतो. जीवन हे अमूल्य आहे. या अमूल्य देहाला सत्कार्यी लावण्याऐवजी जर असे मृत्यूच्या खाईत आपण लोटत असू तर विधात्याने आपणास जन्म देऊन चूक केली काय? असा प्रश्न पडायला लागतो.

ज्या जन्मदात्यांनी आपल्यासाठी कष्ट सोसले. आपल्या आवडी निवडी जपल्या. आपल्याला शिक्षण शिकविण्यासाठी हाल अपेष्टा सहन केल्या. रात्रीचा दिवस करून आपले संगोपन केले. त्या माय बापांना आपल्या पाल्यावर रागवण्याचा सुद्धा अधिकार नाही काय? आपल्या घरच्या परिस्थितीचा आढावा न घेता कुठलीही महागडी वस्तू त्वरीत घेऊन देण्याचा अट्टाहास करणे शहाणपणाचे लक्षण ठरते काय? मोबाईल आज नाही उद्या घेऊन देताच आला असता. मुलगा इतक्या टोकाचे पाऊल उचलत पर्यंत खरेच आई वडिलांना काहीच वाटणार नाही काय? त्यांची सुद्धा काही अडचण असू शकते. ही अडचण समजून घेण्याचा प्रयत्न तर करा! इतरांकडे आय फोन आहे म्हणून गरज नसतांना मला सुद्धा असाच महागडा आय फोन हवा म्हणून माय बापांना वेठीस धरणे, घरून पळून जाणे हल्ली वाढीस लागले आहे. कुणी गाडीचा अट्टाहास करतो तर कुणी मोबाईलचा. मात्र, मला अजून शिकायचे आहे, असा अट्टाहास करतांना कुणी मुलगा दिसत नाही. यावरून आताच्या युवकांना शिक्षणापेक्षा चैनीच्या वस्तूंचे अधिक आकर्षण आहे, हे दिसून येते. आणि हे आकर्षण कसे जीवघेणे ठरू शकते, याचं जिवंत उदाहरण म्हणून खावड्या डोंगर साक्ष असणारे छत्रपती संभाजी नगरचे मागच्या आठवड्यात घडले. चंदगुडे कुटुंबातील वरील प्रकरण अंगावर रोमांच उभे करणारे आहे. विस्कळीत समाजव्यवस्थेचे द्योतक आहे.

विद्यार्थ्यांच्या अंगातील सहनशीलता संपत चालली की मायबापांकडून पाल्यांचे अती प्रमाणात लाड होते आहे, हे कळायला मार्ग नाही. मात्र, हृदय हेलावून सोडणाऱ्या अशा घटना बघितल्या की ही माणसाची अधोगती होत असल्यासारखे वाटून जाते. मानसोपचार तज्ज्ञांनुसार, सध्या मोबाइलचे व्यसन ही सर्वाधिक चिंतेची बाब असून आठवड्याला आमच्याकडे ४ ते ५ पालक पाल्याच्या मोबाईल व्यसनाची तक्रार घेऊन येत असतात, असेही कित्येक मानसोपचार तज्ज्ञ सांगायला लागतात. मोबाईलच्या अतिवापरामुळे वडील रागावल्याने आरती सुनील सिदलंबे या २० वर्षीय महाविद्यालयीन तरुणीने केलेली आत्महत्या, घरी उशिरा आल्याच्या कारणावरून वडिलांनी रागावल्याने आणि किरकोळ मारहाण केली. याचा राग मनात धरुन १६ वर्षीय प्रज्ञा रवींद्र शिंदे या जळगाव येथील मुलीने विहिरीत उडी घेऊन केलेली आत्महत्या (२०२५), शाळेला उन्हाळ्याच्या सुट्या असून सतत मोबाईलवर गेम खेळणाऱ्या मुलीला आई रागावली आणि तणावात येऊन तिने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची कामठीतील लष्कर छावणीतील घटना ( २०१७ ), आई रागावल्याने काळेवाडी येथील राहत्या घरामध्ये गळफास घेऊन सेजल दोरास्वामी मुदलीयार या चौदा वर्षीय मुलीने केलेली आत्महत्या (२०१८), आईने सकाळी पैशावरून रागावल्याने नागपूर गोपालनगरातील निशीला संजय बागडे या बारा वर्षीय मुलीने साडीच्या साहाय्याने गळफास घेत केलेली आत्महत्या ( २०२४ ), घरची कामे न करता सतत मोबाईल बघते म्हणून आई रागावल्याचा राग मनात धरून स्वतःला जाळून घेणारी नागपूर जरीपटका येथील रोमा अहमद खान ( २०१८), पालक रागावल्याने टेरेसवरून उडी मारून आत्महत्या करणारी बारामती येथील अवनी अजित दशावतारी ( ऑगस्ट २०२६), सिनेमॅटिक व्हिडिओ आणि रिल्स बनविण्यासाठी आय फोनचा आग्रह धरणाऱ्या अमरावती खोलापुरी गेट येथील १५ वर्षीय मुलाने स्वतःवरच चाकूने वार करून आत्महत्या करण्याचा केलेला प्रयत्न (ऑगस्ट २०२६),या सर्व घटना बघितल्या की हल्लीच्या पिढीचा संयम अगदी क्षुल्लक अशा कारणांनी सुद्धा ढळतो आहे, हे लक्षात येते. तंत्रज्ञान वाढलं म्हणून मनाला वाटेल ती वस्तू त्वरीत हवी, या जिद्दीपोटी आजपर्यंत कित्येकांचे कुटुंब उध्वस्त झालेले आहे. मोबाईल, गाडी यासारख्या वस्तू आज नाही उद्या नक्कीच मिळेल. मात्र, गेलेला जीव पुन्हा परतेल काय? म्हणून क्षुल्लक अशा गोष्टींसाठी स्वतःचा जीव धोक्यात न घालता युवकांनी तसेच किशोरवयीन मुला मुलींनी संयम बाळगायला हवा. आई वडिलांसाठी नाही तर निदान स्वतःच्या भविष्याचा विचार करता शिक्षणाचे ध्येय बाळगून त्यात यश मिळविण्याचा प्रयत्न करायला हवा. यामुळे कुठले कुटुंब उध्वस्त होणार नाही आणि संभाजी नगर सारख्या घटनांची पुनरावृत्ती होणार नाही.

- ८४१२८७७२२०

# ऑपरेशन सिंदूरनंतरही मसूदचा मरकद जिवंत; दहशतवादाचा नवा विळखा?

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

भारताने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत उद्ध्वस्त केलेले पाकिस्तानच्या बहावलपूरमधील जैश-ए-मोहम्मदचे मरकज सुभानअल्लाह हे मुख्यालय पुन्हा बांधून पूर्णपणे तयार करण्यात आले आहे. उपग्रहाद्वारे मिळालेली ताजी छायाचित्रे आणि गुप्तचर यंत्रणांच्या अहवालानुसार या इमारतीची डागडुजी करून ती पुन्हा सक्रिय करण्यात आली आहे. भारतीय हवाई हल्ल्यानंतर १५ महिन्यांनी, या दहशतवादी तळाची झालेली पुनर्रचना आणि मसूद अझहरकडून सातत्याने मिळणाऱ्या धमक्यांमुळे दहशतवादाचा नवा विळखा निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

पाकिस्तानच्या भूमीवर दहशतवादी पायाभूत सुविधांचे पुनरुज्जीवित होणे, ही प्रादेशिक शांततेसाठी अत्यंत चिंतेची बाब बनली आहे. भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत उद्ध्वस्त करण्यात आलेले जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तैयबा सारख्या दहशतवादी संघटनांचे तळ पुन्हा सक्रिय झाल्याचे समोर आल्याने पाकिस्तानच्या हेतूंवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

२२ एप्रिल २०२५ रोजी काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २५ हून अधिक लोकांचा मृत्यू झाला होता. या भ्याड हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी भारतीय हवाई दलाने ७ मे २०२५ रोजी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील तब्बल ९ दहशतवादी तळ क्षेपणास्त्र हल्ले करून उद्ध्वस्त केले होते, ज्यात बहावलपूरच्या या मुख्य अड्ड्याचाही समावेश होता.

भारताने ७ मे २०२५ रोजी केलेल्या हल्ल्यानंतर अवघ्या १५ महिन्यांच्या कालावधीत हे काम पूर्ण करण्यात आले आहे. ताज्या फोटोंमध्ये संकुलाचे उद्ध्वस्त झालेले घुमट, नवीन प्लास्टर, रंगकाम आणि अंतर्गत भागात नवीन मार्बल बसवल्याचे स्पष्ट दिसत आहे.

गुप्तचर अहवालानुसार, कंगाल झालेल्या पाकिस्तान सरकारने आणि तिथल्या लष्करी यंत्रणांनी या मुख्यालयाच्या पुनर्बांधणीसाठी जैश-ए-मोहम्मदला २५ कोटी पाकिस्तानी रुपयांचा निधी दिला होता. यातील जवळपास ११ कोटी रुपये केवळ मुख्य संकुलाच्या आणि मध्यवर्ती हॉलच्या दुरुस्तीसाठी वापरण्यात आले.हे मुख्यालय जैश-ए-मोहम्मदसाठी दहशतवाद्यांची भरती, प्रशिक्षण आणि भारताविरोधातील कारवायांचे मुख्य केंद्र म्हणून ओळखले जाते.

जैश-ए-मोहम्मदचा प्रमुख मसूद अझहर सध्या आजारपणामुळे सक्रिय नसल्याने, या बहावलपूर मुख्यालयाचा दैनंदिन कारभार त्याचे भाऊ तल्हा अल-सैफ आणि मोहिनुद्दीन औरंगजेब पाहत आहेत. मसूद अझहर स्वतः सिंधमधील नवाबशाह येथे सुरक्षित ठिकाणी लपल्याची माहिती आहे.

**पाकिस्तानचे धोरण आणि छुपे हेतू:**

नवा 'टेरर प्लेबुक' : आंतरराष्ट्रीय दबाव आणि कारवाई टाळण्यासाठी पाकिस्तानने थेट दहशतवादी हल्ले करण्याऐवजी छोट्या, विखुरलेल्या आणि 'डिजिटल मॉड्यूल्स'चा वापर सुरू केला आहे, ज्यांचा माग काढणे कठीण जाते.



प्रॉक्सी संघटनांचा वापर: जैश आणि लष्कर या प्रतिबंधित संघटनांचे अस्तित्व लपवण्यासाठी 'द रेझिस्टन्स फ्रंट' सारख्या नवीन स्थानिक नावांचा वापर करून भारताविरुद्ध छुपे युद्ध सुरू ठेवण्याचा पाकिस्तानचा मुख्य हेतू आहे.

ऑपरेशन सिन्दुर हल्ल्यात मसूद अझहर या कारवाईतून थोडक्यात वाचला असला, तरी या घटनेनंतर तो दीर्घकाळ अंडरग्राउंड झाला होता. मात्र, अलीकडच्या काळात त्याच्याकडून जारी करण्यात आलेल्या ऑडिओ क्लिप्स आणि पत्रांद्वारे त्याने पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. मसूद अझहरने आपल्या पत्रांमध्ये 'ऑपरेशन सिंदूर'मुळे जैशच्या नेटवर्कचे कंबरडे मोडल्याचे मान्य केले आहे. परंतु, कुटुंबाच्या मृत्यूचा सूड घेण्यासाठी तो आता भारताविरुद्ध मोठ्या आत्मघाती हल्ल्यांची धमकी देत आहे. त्याने पाकिस्तानी लष्कर आणि आयएसआयला भारताविरुद्ध थेट लष्करी कारवाई करण्याचे आवाहन केले आहे.जरी भारताच्या अचूक कारवाईमुळे जैशची पाळेमुळे मुळासकट हादरली असली, तरी पाकिस्तानकडून या मरकजला पुन्हा जिवंत केले जाणे हे भारताच्या सुरक्षेसाठी आणि सीमावर्ती भागांसाठी एका नव्या आव्हानाची नांदी मानली जात आहे. यामुळेच भारतीय गुप्तहेर यंत्रणा आणि सुरक्षा दल सध्या हाय अलर्टवर आहेत.

संकुलाच्या पुनरुज्जीवनामुळे पाकिस्तानच्या भूमीवरील दहशतवादी पायाभूत सुविधा आणि त्यांच्या हेतूंवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे दहशतवादी तळांचे हे पुनरुज्जीवन हे स्पष्ट करते की आंतरराष्ट्रीय दबाव असूनही पाकिस्तान आपल्या भूमीवरील दहशतवादी इकोसिस्टम संपवण्यास तयार नाही.

सीमाभागात आता पारंपारिक घुसखोरीऐवजी स्फोटके आणि हत्यारे पाठवण्यासाठी आधुनिक ड्रोन आणि 'क्वाडकॉप्टर्स'चा वापर लक्षणीयरीत्या वाढला आहे भारताच्या संरक्षण दलांनी स्पष्ट केले आहे की पाकिस्तानकडून होणाऱ्या कोणत्याही कुरापतीला किंवा छुप्या हल्ल्यांना 'ऑपरेशन सिंदूर'सारख्याच कठोर आणि थेट लष्करी कारवाईने चोख प्रत्युत्तर दिले जाईल.

पाकिस्तानने वारंवार आंतरराष्ट्रीय मंचावर दहशतवादविरोधात दावे केले असले, तरी प्रत्यक्षात त्यांच्याच भूमीवर दहशतवादी संघटनांना मिळणारे आर्थिक आणि राजकीय संरक्षण त्यांच्या दुटप्पी धोरणावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब करते.

- ९५६१५९४३०६

# भारताने फॉलोऑन देऊन योग्य केलं?

डॉ. दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

भारत आणि श्रीलंका यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी, भारतीय संघाने श्रीलंकेला त्यांच्या पहिल्या डावात २९० धावांवर गुंडाळले. भारताने आपला पहिला डाव ९ गडी बाद ५०३ धावांवर घोषित केला, ज्यामुळे श्रीलंका २१३ धावांनी मागे पडली. त्यानंतर भारतीय कर्णधार शुभमन गिलने श्रीलंकेला फॉलो-ऑन दिला.

चौथ्या दिवशी श्रीलंकेने तिसऱ्या दिवसाच्या २६५ धावांवर ८ गडी बाद या धावसंख्येवरून खेळ पुन्हा सुरू केला. सोनल दिनुशाने एक बाजू सांभाळत एक शानदार शतक झळकावले. तथापि, खालच्या फळीतील फलंदाज भारतीय गोलंदाजांसमोर जास्त काळ टिकू शकले नाहीत आणि संघ २९० धावांवर सर्वबाद झाला.

**दिनुशाचे सलग दुसरे शतक**

सोनल दिनुशाने भारताविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी मालिकेत आपले सलग दुसरे शतक झळकावले. तिसऱ्या दिवशी ८५ धावांवर नाबाद राहिलेल्या दिनुशाने चौथ्या दिवशी आपला डाव १०३ धावांपर्यंत वाढवला. तिच्या शानदार खेळीने श्रीलंकेला सुरुवातीच्या संकटातून बाहेर काढण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

मात्र, शतक पूर्ण केल्यानंतर दिनुशा खेळपट्टीवर फार काळ टिकू शकला नाही. सारांश जैनने त्याला स्लिपमध्ये केएल राहुलकरवी झेलबाद करून श्रीलंकेचा पहिला डाव संपवला.

**सारांश जैनने पहिला आंतरराष्ट्रीय बळी घेतला**

सारांश जैनने चौथ्या दिवसाची संस्मरणीय सुरुवात केली. त्याने सर्वप्रथम यष्टीरक्षक ध्रुव जुरेलकरवी लाहिरू कुमारचा झेल घेऊन आपला पहिला आंतरराष्ट्रीय बळी घेतला. त्यानंतर त्याने सोनल दिनुशाला बाद करून श्रीलंकेचा डाव संपवला. सारांश जैनने भारताच्या खालच्या फळीतील दोन्ही फलंदाजांना बाद करून श्रीलंकेला २९० धावांवर रोखले.

**प्रसिद्ध कृष्णा आणि मानव सुथार यांनी दबाव निर्माण केला**

तिसऱ्या दिवशी सुरुवातीला भारताने श्रीलंकेवर सतत दबाव कायम ठेवला. प्रसिद्ध कृष्णाने सुरुवातीलाच बळी घेतले, तर मानव सुथारनेही उत्कृष्ट गोलंदाजी करत श्रीलंकेच्या फलंदाजीची रचना विस्कळीत केली. श्रीलंकेसाठी पसिंदू सुरियाबंदारा आणि सोनल दिनुशा यांना संघर्ष करावा लागला, परंतु यजमान संघ भारतीय गोलंदाजांसमोर मोठी धावसंख्या उभारू शकला नाही. तिसऱ्या दिवशी श्रीलंकेने २६५/८ धावा केल्या आणि पावसामुळे खेळ वेळेपूर्वीच थांबवण्यात आला.

**भारताने पहिल्या डावात ५०३ धावा केल्या**

यापूर्वी, भारताने आपला पहिला डाव ५०३ धावांवर ९ गडी बाद असताना घोषित केला. देवदत्त पडिक्कलने शानदार ११७ धावा केल्या, तर ध्रुव जुरेलने ११५ धावांची नाबाद खेळी केली. रिषभ पंतनेही आक्रमक ६३ धावा केल्या आणि जुरेलसोबत सहाव्या विकेटसाठी ११२ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. जुरेलने ९ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने १७७ चेंडूंमध्ये आपले शतक पूर्ण केले.

**नियमबाह्य वर्तन**

श्रीलंकेचा फिरकी गोलंदाज प्रभात जयसूर्या याला कोलंबो येथे भारताविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यादरम्यान आयसीसी आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल अधिकृतपणे ताकीद देण्यात आली आहे आणि एक डिमेरिट पॉइंटही देण्यात आला आहे. आयसीसीच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, खेळाडू आणि खेळाडूंच्या सहाय्यक कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या आयसीसी आचारसंहितेच्या कलम २.२ चे उल्लंघन केल्याबद्दल जयसूर्या दोषी आढळला. हे कलम आंतरराष्ट्रीय सामन्यादरम्यान क्रिकेटची उपकरणे, कपडे, मैदानातील उपकरणे किंवा फिक्स्चर आणि फिटिंग्जच्या गैरवापराशी संबंधित आहे.

ही घटना कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी, सोमवारी घडली, जेव्हा दिवसाच्या शेवटच्या चेंडूवर जयसूर्या बाद झाला. पॅव्हेलियनमध्ये परतत असताना, या डावखुऱ्या फिरकी गोलंदाजाने आपल्या बॅटने बाउंड्री वेजला फटका मारला. जयसूर्याने आपला गुन्हा कबूल केला आणि अमिरात आयसीसी एलिट पॅनेल ऑफ मॅच रेफरीजचे अँडी पायक्रॉफ्ट यांनी सुचवलेली शिक्षा स्वीकारली. परिणामी, कोणत्याही औपचारिक सुनावणीची आवश्यकता भासली नाही. मैदानातील पंच अहसान रझा आणि शरफुद्दौला इब्ने शाहिद, तिसरे पंच रॉड टकर आणि चौथे पंच प्रगीथ रामबुकवेला यांनी हा आरोप लावला आहे. जयसूर्याला २४ महिन्यांच्या कालावधीत मिळालेला हा पहिला डिमेरिट पॉइंट आहे.

कोलंबो कसोटीदरम्यान आयसीसीच्या कारवाईला सामोरे जाणारा जयसूर्या हा तिसरा खेळाडू आहे. यापूर्वी, भारताचा यशस्वी जयस्वाल आणि श्रीलंकेचा असिथा फर्नांडो यांना पहिल्या दिवशी झालेल्या वादावादीबद्दल दंड ठोठावण्यात आला होता. जयस्वाल आणि फर्नांडो यांच्यातील ही घटना भारताच्या पहिल्या डावाच्या १७ व्या षटकात घडली, जेव्हा श्रीलंकेच्या वेगवान गोलंदाजाने भारतीय सलामीवीराला बाद केले होते. त्यानंतर त्यांच्यात वादावादी झाली, ज्यात फर्नांडोने जयस्वालच्या दिशेने डोके पुढे केले आणि भारतीय फलंदाजानेही वाकून गोलंदाजाकडे धाव घेतली.

हा लेख लिहीला जाईपर्यंत श्रीलंकेने दुसऱ्या डावात एक गडी गमावून ४३ धावा केल्या आहेत. खराब वातावरण व कमी वेळ यामुळे भारताने श्रीलंकेला फॉलोऑन देऊन एक रिस्क खेळली मात्र याचा परिणाम नेमका कोणाच्य झोळीत जाईल हे येत्या दोन दिवसांत समजेलच.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# नरखेड तालुक्यात वन्यप्राण्यांचा धुमाकूळ; उभ्या पिकांची नासधूस, शेतकरी हैराण!

## रानडुकरे व रोहीच्या उपद्रवाने वाढली चिंता; पंचनाम्यातील दिरंगाई, प्रलंबित कुंपण अर्जांमुळे संताप

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यात वन्यप्राण्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून, वन संरक्षित क्षेत्रालगतच्या गावांतील शेतकरी अक्षरशः हैराण झाले आहेत. रानडुकरे, रोही (नीलगाय) आदी वन्यप्राणी रात्रीच्या वेळी शेतांमध्ये घुसून उभ्या पिकांची मोठ्या प्रमाणात नासधूस करीत असल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जात आहे. वाढता उत्पादनखर्च, अनिश्चित हवामान आणि आता वन्यप्राण्यांकडून होणारे नुकसान यामुळे शेतकऱ्यांना दुहेरी संकटाला सामोरे जावे लागत आहे.



नरखेड तालुक्यातील वन संरक्षित क्षेत्रालगतच्या अनेक गावांमध्ये ही समस्या गंभीर बनली आहे. सोयाबीन, कपाशी, तूर, भाजीपाला तसेच इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. दिवसभर काबाडकष्ट करून उभे केलेले पीक रात्रीतून वन्यप्राणी उद्ध्वस्त करीत असल्याने अनेक शेतकऱ्यांना रात्रभर शेतात जागता पहारा द्यावा लागत आहे.

वन्यप्राण्यांकडून पिकांचे नुकसान झाल्यानंतर नुकसानभरपाई मिळविण्यासाठी पंचनामा करणे महत्त्वाचे असते. मात्र, पंचनामा वेळेत होत नसल्याने नुकसानभरपाईच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. संबंधित विभागाकडे अर्ज करूनही प्रत्यक्ष पाहणी व पंचनाम्यास विलंब होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

वन्यप्राण्यांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास संबंधित वनक्षेत्राच्या अधिकारक्षेत्रातील अधिकाऱ्यांकडे अर्ज करण्याची प्रक्रिया आहे. नुकसान झालेल्या शेताची पाहणी करून नुकसानीचे मूल्यांकन केले जाते. मात्र, ही प्रक्रिया अधिक जलद व प्रभावी करण्याची मागणी आता शेतकऱ्यांकडून जोर धरत आहे.

वन संरक्षित क्षेत्रालगतच्या अनेक शेतकऱ्यांनी शेताला तार कुंपण व सौर झटका मशीन बसविण्यासाठी वन विभागाकडे अर्ज केले आहेत. मात्र, हे अर्ज अद्याप प्रलंबित असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. तार कुंपण, सौर कुंपण तसेच इतर प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविल्यास वन्यप्राण्यांकडून होणाऱ्या पिकांच्या नुकसानीला मोठ्या प्रमाणात आळा बसू शकतो, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्यासाठी शेतकऱ्यांना दिवसभर शेतीची कामे करून रात्री पिकांच्या संरक्षणासाठी जागरण करावे लागत आहे. रात्रभर शेतात पहारा आणि दिवसभर शेतीची कामे यामुळे शेतकऱ्यांवर अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे. वन्यप्राण्यांच्या भीतीमुळे शेतकऱ्यांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण होत असल्याचे सांगण्यात येत आहे.

दरम्यान, वन संरक्षित क्षेत्रालगतच्या गावांमध्ये वनसमित्यांच्या प्रभावी कार्यवाहीचीही मागणी करण्यात येत आहे. अनेक ठिकाणी आवश्यक यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत नसल्याने शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्यात अडचणी येत असल्याची तक्रार आहे.

> वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे नरखेड तालुक्यातील शेतकरी प्रचंड अडचणीत सापडले आहेत. अनेक शेतकऱ्यांची उभी पिके उद्ध्वस्त होत असताना नुकसान झाल्यानंतर पंचनाम्यासाठीही विलंब होतो. शेतकऱ्यांनी कुंपणासाठी केलेले अर्ज प्रलंबित आहेत. वन विभागाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी तसेच सौर व तार कुंपणासारख्या कायमस्वरूपी उपाययोजना राबवाव्यात.
> **– वसंत चांडक, माजी सभापती, पंचायत समिती नरखेड**
>
> ----------------------------------------
>
> दिवसभर शेतात कष्ट करून रात्री पुन्हा पिकांचे संरक्षण करण्यासाठी जागरण करावे लागते. रानडुकरे आणि रोही उभ्या पिकांचे मोठे नुकसान करतात. पिकांचे नुकसान म्हणजे वर्षभराची मेहनत वाया जाण्यासारखे आहे. प्रशासनाने वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करून शेतकऱ्यांच्या पिकांचे संरक्षण करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात.
> **– विनोद बागडे, शेतकरी, जामगाव**

वन्यप्राण्यांचा वाढता वावर आणि पिकांचे सातत्याने होणारे नुकसान लक्षात घेता केवळ पंचनामे व नुकसानभरपाईपुरती कार्यवाही न करता वन विभागाने सौर कुंपण, तार कुंपण, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि वन्यप्राण्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यासाठी कायमस्वरूपी प्रभावी यंत्रणा उभारावी, अशी जोरदार मागणी नरखेड तालुक्यातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

शेतकऱ्यांचे म्हणणे स्पष्ट आहे की, नुकसानभरपाई ही तात्पुरती मलमपट्टी असून वन्यप्राण्यांचा बंदोबस्त आणि पिकांचे प्रभावी संरक्षण हाच कायमस्वरूपी उपाय आहे.

## जामगाव फाट्यावर काळाचा घाला! अज्ञात मोटरसायकलच्या धडकेत महिलेचा मृत्यू

### शेताकडे जात असताना भीषण अपघात; सोबतची १८ वर्षीय मुलगी सुदैवाने बचावली, वाहनचालक पसार

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

जामगाव फाटा परिसरात शेताकडे जात असलेल्या महिलेला अज्ञात मोटरसायकलने जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात मंदा



मुनिराज करसडीये (वय ५०) यांचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला. बुधवारी सकाळी सुमारे ११ वाजताच्या सुमारास घडलेल्या या घटनेने जामगाव परिसरात एकच हळहळ व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, मृत महिलेसोबत असलेली तिची १८ वर्षीय मुलगी सुदैवाने या अपघातातून सुखरूप बचावली. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, मंदा करसडीये या आपल्या १८ वर्षीय मुलीसह शेताकडे जात होत्या. जामगाव फाटा परिसरातून जात असताना अचानक अज्ञात मोटरसायकलस्वाराने त्यांना जोरदार धडक दिली. धडक इतकी जबरदस्त होती की मंदा करसडीये गंभीर जखमी होऊन रस्त्यावर कोसळल्या. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमी महिलेला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र, गंभीर दुखापतीमुळे उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. शेतातील दैनंदिन कामासाठी घरातून बाहेर पडलेल्या महिलेवर काळाने अचानक घाला घातल्याने करसडीये कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

या अपघातात मंदा करसडीये यांच्यासोबत असलेली त्यांची १८ वर्षीय मुलगी मात्र सुदैवाने बचावली असून तिला कोणतीही इजा झाली नसल्याची प्राथमिक माहिती आहे. आईच्या डोळ्यादेखत घडलेल्या या दुर्घटनेमुळे मुलीवरही दुःखाचा मोठा आघात झाला आहे. दरम्यान, अपघातानंतर संबंधित अज्ञात मोटरसायकलस्वार घटनास्थळावरून पसार झाल्याची माहिती आहे. अपघात घडवून वाहनचालकाने घटनास्थळावरून पलायन केल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. संबंधित वाहनचालकाचा तातडीने शोध घेऊन त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासनाने तपासाची चक्रे फिरविली असून अज्ञात मोटरसायकलस्वाराचा शोध सुरू करण्यात आला आहे. परिसरातील नागरिकांकडून माहिती घेण्यासह अपघाताच्या सर्व बाजूंनी तपास केला जात आहे.

**रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर**

जामगाव फाटा परिसरात घडलेल्या या दुर्घटनेमुळे रस्त्यावरील भरधाव व निष्काळजी वाहनचालकांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पादचाऱ्यांनी रस्त्याने जाताना सुरक्षिततेची काळजी घेणे जितके महत्त्वाचे आहे, तितकीच वाहनचालकांनी वेगावर नियंत्रण ठेवून जबाबदारीने वाहन चालविण्याची गरज नागरिकांनी व्यक्त केली आहे. या दुर्दैवी घटनेमुळे जामगाव व परिसरात शोककळा पसरली असून मृत महिलेच्या कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी नागरिकांनी धाव घेतली आहे.

## ईद-ए-मिलादुन्नबी रॅलीत बंधुभावाचा संदेश

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर :** ईद-ए-मिलादुन्नबीच्या पवित्र पर्वानिमित्त संघमित्रा चौक मित्र परिवार आणि बल्लारपूर मुस्लिम सेवा



संस्थेच्या वतीने सामाजिक सलोखा व बंधुभावाचा संदेश देत रॅलीतील सहभागी नागरिकांना विविध फळांचे वाटप करण्यात आले. ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त आयोजित रॅलीमध्ये सहभागी झालेल्या मौलाना व नागरिकांचे नगराध्यक्ष अल्का ताई वाढई यांनी पुष्पहार घालून स्वागत केले. यावेळी रॅलीतील सहभागींसाठी सफरचंद, केळी, मोसंबी व डाळिंबाचे वितरण करण्यात आले. या उपक्रमादरम्यान तालुका महिला अध्यक्ष अफसाना सय्यद व रेखा रामटेके यांच्या हस्ते नगराध्यक्षा अल्का वाढई यांचा शाल देऊन सत्कार करण्यात आला. तसेच नगरसेविका वैशाली हुमणे व अँड. मेघा भाले यांचे आरिफ कुरेशी व प्रीतम पाटील यांनी स्वागत केले. कार्यक्रमाला नगरसेवक अब्दुल करीम, इस्माईक ढाकवाला, भास्कर माकोडे यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अँड. आय. ए. सय्यद, शकील शेख, मोहंमद शेख, अख्तर खान पठाण, मुबारक शेख, सुहान शेख, अयान शेख, फारुख शेख आदींनी परिश्रम घेतले. ईद-ए-मिलादुन्नबीच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमातून सामाजिक एकोपा, आपुलकी आणि बंधुभावाचा संदेश देण्यात आला.

## वाडीत श्रावणी झुला-मंगळागौर फ्युजन उत्साहात

### शिवनेरी महिला मंडळाचा स्तुत्य उपक्रम; विविध स्पर्धांना महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

श्रावण महिन्याचे औचित्य साधून शिवनेरी महिला मंडळाच्या वतीने रामकृष्ण सभागृहात शनिवारी, दि. २२ ऑगस्ट रोजी श्रावणी झुला-मंगळागौर फ्युजन कार्यक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. पारंपरिक संस्कृती, महिलांचे कलागुण आणि सर्जनशीलतेला व्यासपीठ देणाऱ्या या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या श्रावणसुंदरी स्पर्धेत निधी रॉय यांनी प्रथम, तर अश्विनी निंबाळकर यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. बेलन सजावट स्पर्धेत सुषमा भागडे यांनी प्रथम, तर श्रीमती नासरे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच घागर सजावट स्पर्धेत सोनाली नागपूरे यांनी प्रथम, नासरे यांनी द्वितीय, तर भाग्यश्री मेश्राम यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

घागर व बेलन सजावट स्पर्धेत महिलांनी विविध कलात्मक वस्तूंचा वापर करून आकर्षक सजावट सादर केली. त्यांच्या कल्पकता, कलात्मकता आणि सर्जनशीलतेचे यावेळी दर्शन घडले. आनंद मेळाव्याच्या माध्यमातून महिलांना त्यांच्या कलागुणांसोबतच छोट्या व्यवसायांना प्रोत्साहन देण्यासाठीही व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले.

सर्व विजेत्या स्पर्धकांना शिवनेरी महिला मंडळाच्या संस्थापिका तथा नगरसेविका पूर्वा हर्षल काकडे यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. महिलांना पारंपरिक संस्कृतीशी जोडून ठेवतानाच त्यांच्या कलागुणांना आणि व्यवसायाला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, असे नगरसेविका पूर्वा काकडे यांनी सांगितले.

कार्यक्रमाला परिसरातील शेकडो महिला उपस्थित होत्या. पारंपरिक मंगळागौर, विविध खेळ, सजावट स्पर्धा आणि आनंद मेळाव्यामुळे संपूर्ण वातावरण उत्साहपूर्ण झाले होते.

## थकीत कर्जदारांआधी नियमित कर्जदारांना द्या प्रोत्साहन निधी, शेतकरी आक्रमक



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

शेतकऱ्यांना सतत आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा स्थितीत पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाने आधी प्रोत्साहन निधी द्यावा आणि त्यानंतरच थकीत कर्जदारांना कर्जमाफी द्यावी, अशी जोरदार मागणी मौदा तालुक्यातील शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

> उधार-उसने पैसे घेऊन बँकेची देणी चुकावणाऱ्या शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये. प्रथम प्रोत्साहन निधी देऊन नियमित कर्जदारांचा सन्मान केल्यास बँकिंग व्यवस्थेतही आर्थिक शिस्त निर्माण होईल.
> **– आनंदराव बोबडे, खंडाळा**
>
> ----------------------------------------
>
> - वेळेवर कर्ज भरण्यासाठी खासगी ठिकाणी उधार-उसनवारी करावी लागते. नंतर ती उधारी फेडताना नाकीनऊ येतात. त्यामुळे शासनाने प्रामाणिकपणे कर्जफेड करणाऱ्यांना प्रथम प्रोत्साहन निधी देऊन न्याय दिला पाहिजे.
> **– लाटारू बावनकुळे, नवरगाव**
>
> ----------------------------------------
>
> केवळ थकीत कर्जदारांसाठीच योजना राबवल्यास नियमित कर्ज भरणाऱ्यांत निराशा येते. नियमित कर्जदारांना प्रोत्साहन निधी दिल्यास इतर शेतकरीही वेळेवर कर्ज भरण्यास प्रवृत्त होतील.
> **– श्रीकांत किरपाण, पिपरी**

नियमित कर्ज भरणारे शेतकरी बँकेचे हप्ते वेळेवर भरण्यासाठी नातेवाईक, मित्र किंवा खासगी सावकारांकडून उसनवारी करतात. वेळेवर कर्ज भरल्याने त्यांची पत अबाधित राहते, मात्र ही उधारी फेडताना, त्यांची मोठी आर्थिक कोंडी होते. परिणामी, पुढील हंगामातील बियाणे व खतांसाठी निधी उभारणे कठीण जाते. दुसरीकडे, थकीत कर्जदारांनाकर्जमाफीचा थेट लाभ मिळतो, ज्यामुळे प्रामाणिकपणे कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये अन्यायाची भावना निर्माण होत आहे. त्यामुळे शासनाने प्रथम नियमित कर्जदारांसाठी स्वतंत्र प्रोत्साहन निधी जाहीर करून त्यांचा सन्मान करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### थोडक्यात

## ...अखेर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वायगाव येथे रेती टाकून पटांगण केले चिखलमुक्त, गट्टूही लावणार: ग्रा पं सदस्य जगन्नाथ गायधने



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

गट ग्रामपंचायत सिरसोली अंतर्गत येणाऱ्या वायगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पटांगणात चिखल असल्याचे वृत्त विविध मराठी व हिंदी दैनिकांमध्ये प्रसारित होताच, वृत्ताची दखल घेत ग्रामपंचायततर्फे ७ ट्रॅक्टर रेती टाकून चिखलयुक्त पटांगण चिखलमुक्त केल्याचे मंगळवार (ता. २५ ऑगस्ट) सायंकाळी ४ वाजताच्या दरम्यान रेती टाकल्याच्या व्हिडिओ पाठवून व भ्रमणध्वनी वरून संपर्क साधून गट ग्रामपंचायत सिरसोली चे वायगाव येथे राहणारे ग्रामपंचायत सदस्य जगन्नाथ गायधने यांनी संबंधित प्रतिनिधीला सांगितले. गट्टू लावण्याबाबत विचारपूस केली असता,गट्टू लावण्याचे प्रस्ताव पाठविले आहे. प्रस्ताव मंजूर होताच गट्टू पण लावणार असल्याचे त्यांनी सांगितले. पटांगण चिखलमुक्त झाल्याने शाळेतील विद्यार्थी मनसोक्तपणे पटांगणावर खेळताना दिसले.

## सट्टापट्टी, अवैध दारूविक्रीवर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; दोघांना अटक

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

नागपूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) भिवापूर शहर आणि तालुक्यातील जवळी येथे मंगळवारी सायंकाळी केलेल्या दोन स्वतंत्र कारवायांमध्ये सट्टापट्टी घेणाऱ्या एका व्यक्तीसह अवैध दारूविक्री करणाऱ्याला अटक केली. या कारवाईत सुमारे चार हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. भिवापूर शहरातील भिमादेवी मार्गावर सट्टापट्टी घेत असल्याच्या माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई केली. या प्रकरणात अंकुश माकडी (४५, रा. भिवापूर) याला रंगेहात ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून २ हजार ३८० रुपये रोख व सट्टापट्टीचे साहित्य जप्त करण्यात आले.

दुसरी कारवाई जवळी गावाच्या शिवारात करण्यात आली. अनिल सोळंके (रा. गरडापार, ता. भिवापूर) हा अवैधरित्या देशी दारूची विक्री करीत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून १ हजार ७१० रुपये किमतीच्या देशी दारूच्या १९ निप जप्त करण्यात आल्या. दोन्ही आरोपींविरुद्ध भिवापूर पोलिस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे एपीआय पारवी, एपीआय मडावी, उपनिरीक्षक बद्गूलाल पांडे, सिपाही रोहित आडे आणि चालक राहुल पाटील यांनी ही कारवाई केली.

## जिल्हा परिषद प्रायमरी सेमी इंग्लिश स्कूल भोवरी शाळेत उतरले इंद्रधनुष्याचे रंग- राज्यस्तरीय बालचित्रकला स्पर्धेचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या बालचित्रकला स्पर्धा २०२६ साठी जिल्हा परिषद प्रायमरी सेमी इंग्लिश स्कूल भोवरी येथे चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व शासनमान्य प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता १ ली ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी ८ ऑगस्ट २०२६ रोजी बालचित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे विषय ऑनलाइन पद्धतीने कळवण्यात आले इयत्ता १ ली - २ री साठी विदुषक, घर, माझा आवडता कार्टून तसेच इयत्ता ३ री -४ थी साठी सूर्यास्त, शाळेत जाणारी मुले आणि प्राणी संग्रहालय भेट असे विषय होते. महाराष्ट्रात ८ ऑगस्ट २०२६ ला ही स्पर्धा राबविण्यात आली.

मुख्याध्यापिका पठाण तब्बसूम अयुबखान यांनी विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी सुंदर चित्रण करून रंग भरले. त्यांनी आपल्या कल्पनाशक्तीला रंगांच्या माध्यमातून वाट मोकळी करून दिली. सकाळी ८ वाजता स्पर्धेला सुरुवात झाली. स्पर्धेत इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या सुमारे १० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. दोन गटांमध्ये ही स्पर्धा घेण्यात आली. मुख्याध्यापिका पठाण यांनी स्पर्धेचे उद्घाटन केले. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, "चित्रकला ही केवळ छंद नाही, तर विचार मांडण्याचे एक प्रभावी माध्यम आहे. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये कलागुणांना वाव मिळाला असून पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवडक विद्यार्थ्यांना पाठवण्यात येणार आहे.

## पारशिवनी शहरात ईद-ए-मिलाद-उन-नबी जन्मदिन उत्साहात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारशिवनी शहरात ईद-ए-मिलाद-उन-नबीचा सण पैगंबर हजरत मुहम्मद यांच्या जन्मदिवसानिमित्त पारशिवनी शहरात मोठ्या धार्मिक उत्साहात आणि श्रद्धेने शेकडो समाजबांधवांच्या उपस्थित साजरा करण्यात आला. तिसऱ्या 'रबी-उल-अव्वल' महिन्याच्या १२ व्या दिवशी हा सण येतो. या दिवशी पैगंबर मुहम्मद यांचा जन्म झाला होता. त्यानिमित्त पारशिवनी शहरांमध्ये मोठ्या संख्येने भव्य मिरवणुक काढण्यात आली: पारशिवनी जामा मज्जीदींमध्ये विशेष नमाज पठण, 'मिलाद मेहफिल' आणि 'सीरत कॉन्फरन्स'चे आयोजन करण्यात आले होते. यात पैगंबरांच्या जीवन व शिकवणीवर प्रकाश टाकण्यात आला. नात व कुरआनचे पठण आणि पैगंबरांच्या स्तुतीपर काव्यांचे (नात) सादरीकरण या निमित्ताने करण्यात आले होते. शहरातील मुस्लिम बांधवांनी घरे आणि मशिदींना आकर्षक रोषणाई केली होती.

थोडक्यात

## नवनियुक्त गटशिक्षणाधिकारी लीना वालोदे यांची जि. प प्राथमिक शाळा घोटमुंढरीची पाहणी

### मुख्याध्यापक, शिक्षकवृंदासह शालेय व्यवस्थापन समितीची केली स्तुती



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

शुक्रवार (ता. २१ ऑगस्ट) ला पंचायत समिती मौदा येथील नवनियुक्त गटशिक्षणाधिकारी लीना वालोदे ,विस्तार अधिकारी संकेत मरसकोल्हे आणि त्यांचे कार्यालयीन गटसाधन केंद्राचे चे सह कर्मचारी यांनी घोटमुंढरी येथील आदर्श जिल्हा परिषद शाळेला भेट देऊन पाहणी केली असता शाळेतील वेगवेगळ्या वगार्तील विद्यार्थी गुणवत्ता,शासनाकडून मिळालेले डिजिटल विविध संसाधने, कळळ लॅब, अकलॅब इत्यादी चे सुद्धा निरीक्षण केले व विद्यार्थी समवेत अनुभव घेतले असता विद्यार्थी गुणवत्ता, इतर उपक्रम,साधनांचा योग्य वापर आणि मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद व शाळा व्यवस्थापन समिती या सर्वांची मेहनत व कार्याची स्तुती करून उत्साह वाढवण्यावर भर दिले.

तसेच शाळेच्या अडचणी दूर करण्यासाठी सुद्धा माहिती घेऊन,सूचना देऊन मार्गदर्शन केले. शाळा व डायनिंग अपूर्ण बांधकामावर सुद्धा दखल घेतली. त्यामुळे शाळेतील मुख्याध्यापक विकास धारगावे, समस्त शिक्षकवृंद, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उदय पांडे सह समस्त सदस्यगण यांनी गटशिक्षणाधिकारी लीना वालोदे यांचे आभार मानले.

## एल .ए .डी. महाविद्यालयात पंतप्रधान मोदी साधणार युवांशी संवाद आज



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या पार्श्वभूमीवर २७ ऑगस्ट रोजी देशभरात विकसित भारत युवा कनेक्ट राष्ट्रीय क्रीडा दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी देशभरातील १,६०० हून अधिक ठिकाणी सहभागी होणाऱ्या ८ लाखांहून अधिक युवकांशी आभासी माध्यमातून संवाद साधणार आहेत. महाराष्ट्र व गोवा राज्यांतील २३ महाविद्यालयांची या कार्यक्रमासाठी निवड झाली असून, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून एल.ए.डी. महाविद्यालयाची एकमेव निवड झाली आहे. एल.ए.डी. महाविद्यालयातील कार्यक्रमाला नागपूरच्या महापौर नीता ठाकरे आणि आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनपटू व महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी अरुंधती पानतावणे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

पंतप्रधानांच्या संबोधनानंतर स्थानिक युवकांशी संवादाचे विशेष सत्र होणार असून, युवकांना त्यांच्या कल्पना, सूचना व आकांक्षा मांडण्याची संधी मिळणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विमेन्स एज्युकेशन सोसायटीच्या सचिव डॉ.नंदा राठी, प्राचार्य डॉ.पूजा पाठक तसेच एन. एस. एस.विभागाची चमू परिश्रम घेत आहे. अशी माहिती पत्रकार परिषदेत प्रचिती बगाडे यांनी दिली. यावेळी पत्रकार परिषदेला उपस्थित पूजा पाठक, श्रद्धा पांडे, रश्मी कोचे, पल्लवी कोमावार उपस्थित होत्या.

## पत्रकार संघाची नवी कार्यकारिणी गठित, पंढरी हिवसे अध्यक्ष; राजेश जांभुळे सचिव



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद संलग्न भिवापूर तालुका पत्रकार संघाची नवीन कार्यकारिणी मंगळवारी गठित करण्यात आली. दै. नवभारतचे तालुका प्रतिनिधी पंढरी हिवसे यांची अध्यक्षपदी, तर दै. महासागरचे प्रतिनिधी राजेश जांभुळे यांची सचिवपदी निवड करण्यात आली. पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष सुभाष वराडे यांच्या परवानगीने मावळते अध्यक्ष शरद मिरे यांच्या अध्यक्षतेखाली येथील विश्रामगृहात सभा घेण्यात आली. या वेळी समीर पडोळे यांची उपाध्यक्षपदी, नरेंद्र ढोणे यांची सहसचिवपदी, गोकुल वैरागडे यांची कोषाध्यक्षपदी, तर प्रदीप राऊत यांची जिल्हा प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली.

ज्येष्ठ पत्रकार सदाशिव नान्ने आणि जोगेंद्र सरदारे यांची मुख्य मार्गदर्शक म्हणून निवड करण्यात आली. शरद मिरे, अमर मोकाशी, जितेंद्र धोटे, राम वाघमारे, सुनील मैदिले, निशा जांभुळे आणि हर्षल राऊत यांचा सदस्य म्हणून कार्यकारिणीत समावेश आहे. या वेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे उपस्थितांनी अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. संघाच्या माध्यमातून पत्रकारांच्या विविध प्रश्नांसाठी आणि संघटनेच्या बळकटीसाठी कार्य करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## १ सप्टेंबरपासून हेल्मेट सक्ती

**वृत्तसंस्था, लातूर**

लातूर जिल्ह्यात वाढत असलेल्या रस्ते अपघातांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करण्यासाठी प्रशासन व लातूर पोलीस विभागाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. दि. १९ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हाधिकारी, लातूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत जिल्ह्यातील दुचाकीस्वारांसाठी दि. १ सप्टेंबरपासून हेल्मेट वापरणे सक्तीचे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लातूर पोलीस विभागाने वर्षाच्या सुरुवातीपासूनच अपघातांमधील जीवितहानी कमी करण्यासाठी जनजागृती तसेच कायदेशीर कारवाईवर भर दिला आहे.

# अंमली पदार्थांचा काळा धंदा, बनावट नोटांचा खेळ, वन्यजीव अवयवांचा सापळा अन् उमरेड पोलिसांचा धडाका!

### चार आरोपी जेरबंद; रुपये ७ लाख ९० हजारांचा मुद्देमाल जप्त, बनावट नोटा तयार करून फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
**मनिष शिंगणे**

बनावट नोटांचा सापळा रचून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या तसेच वन्यजीवांचे अवयव व अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या आरोपींच्या मुसक्या आवळण्यात उमरेड पोलिसांना मोठे यश आले आहे. पोलिसांनी कारवाई करत चार आरोपींना अटक केली असून तब्बल रुपये ७ लाख ९० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे परिसरातील अवैध व्यवहार करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

वरिष्ठ पोलीस अधीक्षक हर्ष ए. पोदार, अपर पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी मयंक माधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक धनाजी जळक यांच्या नेतृत्वात उमरेड पोलिसांनी ही कारवाई केली. दिनांक २६ ऑगस्ट २०२६ रोजी उमरेड शहरातील घटाटी रोड परिसरात बनावट नोटा तयार करून त्यांची विक्री करणाऱ्या इसमांबाबत पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून संशयित वाहनाची तपासणी केली.

वाहनाच्या तपासणीदरम्यान कुलदीप कश्यप, मोहित नरेश कश्यप व गौरव राधेश्याम कश्यप यांच्यासह एक महिला आढळून आली. वाहनातून रुपये १०० दराच्या बनावट नोटांचे बंडल, कागद, काच, मशीन,लॉकर, केमिकल बाटल्या व इतर साहित्य जप्त करण्यात आले.

याच तपासणीदरम्यान वन्यजीवांच्या अवयवांसदृश वस्तूही पोलिसांच्या हाती लागल्या. त्यामध्ये काळविटाच्या शिंगासारखे एक शिंग, हरणाच्या शिंगासारखे एक शिंग तसेच वाघाचे दात असल्याचे भासणाऱ्या वस्तू आढळल्या. याशिवाय एका धातूच्या डबीत काळ्या-चॉकलेटी रंगाचा पदार्थ मिळून आला.

त्याचे वजन सुमारे ४.३४ ग्रॅम असून त्याची किंमत अंदाजे रुपये २१,७०० असल्याचे नमूद आहे. पोलिसांच्या चौकशीत आरोपी नागरिकांकडून कमी रक्कम घेऊन त्याच्या बदल्यात जास्त रकमेच्या बनावट नोटा देत असल्याचे समोर आले. नागरिकांकडून पैसे घेतल्यानंतर प्रत्यक्ष बनावट नोटा न देता त्यांची फसवणूक करून आरोपी पसार होत असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

या प्रकरणाच्या तपासात अक्षय वसंतराव पाटील, रा. उमरेड याचा सहभाग असल्याचेही निष्पन्न झाल्याचे कागदपत्रात नमूद आहे. पोलिसांनी वाहन, रोख रक्कम, बनावट नोटा आणि अंमली पदार्थ असा एकूण रुपये ७ लाख ९० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी कुलदीप धनुराम कश्यप वय ३६ मोहित नरेश कश्यप वय २६ गौरव राधेश्याम कश्यप वय २५ तसेच एका महिला आरोपीविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. तसेच अक्षय वसंतराव पाटील याच्याविरुद्धही संबंधित कायद्यांतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

बनावट नोटांचा डाव, वन्यजीवांच्या अवयवांची तस्करी आणि अंमली पदार्थांचा व्यवहार अशा गंभीर प्रकारांचा एकाच कारवाईत पदार्फाश झाल्याने उमरेड पोलिसांची ही कारवाई परिसरात चर्चेचा विषय ठरली आहे.

## सिरसपेठ तेलीपुरा येथे कपालेश्वर महादेव कावड यात्रेचा भक्तिमय वातावरणात शुभारंभ

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सिरसपेठ तेलीपुरा येथील हनुमान मंदिरातून शिवशक्ती नागाब्दार स्वामी सेवा मंडळ व नवयुवक हनुमान मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कपालेश्वर महादेव कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले. मंगळवार, २५ ऑगस्ट रोजी या कावड यात्रेचा भक्तिमय वातावरणात शुभारंभ झाला. यावेळी किर्तन, फळवाटप व फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. ढोल- ताशे, भजन व जयघोषाच्या गजरात कावडधारी शिवभक्तांनी सिरसपेठ तेलीपुरा येथील हनुमान मंदिरातून तुळशीबाग, महाल येथील कपालेश्वर



महादेव मंदिरापर्यंत कावड यात्रा काढली.

संपूर्ण मार्गावर हर हर महादेवच्या जयघोषाने वातावरण शिवमय झाले होते. कपालेश्वर महादेव मंदिरात पोहोचल्यानंतर कावडधारी शिवभक्तांनी विधिवत पूजन व महादेवाचा अभिषेक केला. यानंतर कडई व प्रसादाचे आयोजन करण्यात आले. कावड यात्रेत सहभागी झालेल्या सर्व कावड यात्रेकरूंसह शिवभक्तांनी प्रसादाचा लाभ घेतला.

या धार्मिक उपक्रमाच्या आयोजनासाठी शिवभक्त प्रशांत मोटघरे, दिलीप माखाडे, प्रकाश तांदुळकर, राजू तितरे, भगवान नरड, सुनील नांदुरकर, अरविंद शेंडे, किशोर पेटकर व प्रभू रणदिवे यांच्यासह सिरसपेठ परिसरातील महिला व पुरुष शिवभक्तांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी मोरया फाऊंडेशनची संस्थापिका रजनीताई चौहान, सौ. सारिका नांदुरकर, प्र.क्र. १८ च्या नगरसेविका तथा महिला व बाल कल्याण समिती सभापती मनपा, यांची उपस्थिती होती.

यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी शिवभक्तीन चित्रा मोटघरे, नितू ठाकूर, कुंदा हिंगणकर, माधुरी आष्टणकर, वर्षा आकरे, छाया मलेवार, चंदा चकोले, सुनीता शेंडे व राणी गायधने यांच्यासह परिसरातील महिला शिवभक्तांनी सहकार्य केले. या कावड यात्रेला शिवभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## साखरेचा कृत्रिम भाववाढीचा आरोप, धाडी टाकून साठेमुक्त करण्याची ग्राहक पंचायतीची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** सणासुदीच्या पार्श्वभूमीवर व्यापाऱ्यांकडून साखरेचा अवैध साठा करून कृत्रिम भाववाढ केली जात असल्याचा आरोप अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने केला आहे. अन्नधान्य पुरवठा व वितरण विभागाने तातडीने धाडी टाकून साखरेचे साठे मुक्त करावेत आणि भाववाढीवर नियंत्रण आणावे, अशी मागणी जिल्हा व शहर कार्याध्यक्ष संजय धर्माधिकारी आणि जिल्हाध्यक्ष गणेश शिरोळे यांनी केली. सरकारी आकडेवारी नुसार २० जुलै रोजी, साखरेचा दर ४८.१८ रुपये किलो होता. तो २० ऑगस्टला ५५.७० तर २३ ऑगस्टला ६३.१२ रुपयांवर पोहोचला असून बाजारात साखर ७५ रुपये किलोपर्यंत विकली जात असल्याचे त्यांनी सांगितले. यासंदर्भात राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य गजानन पांडे, अनिरुद्ध गुप्ते, प्रकाश भुजाडे, समीर जोशी यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी निवेदनावर सह्या केल्या असून असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कार्याध्यक्ष संजय धर्माधिकारी यांनी कळविले आहे.

## सेठ केसरीमल पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयातर्फे औद्योगिक भेट व शैक्षणिक सहलीचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**

सेठ केसरीमल पोरवाल कनिष्ठ महाविद्यालय, कामठी येथील इयत्ता अकरावी व बारावी वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक १९ ऑगस्ट २०१६ रोजी औद्योगिक भेट व शैक्षणिक सहलीचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या सहलीअंतर्गत विद्यार्थ्यांनी नगरधन येथील सूर्य लक्ष्मी कॉटन मिल येथे औद्योगिक भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांना कापूस प्रक्रिया, उत्पादन प्रक्रिया तसेच उद्योगाच्या विविध कार्यपद्धतींची प्रत्यक्ष माहिती मिळाली. त्यामुळे वाणिज्य विषयातील सैद्धांतिक ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड मिळाली.

त्यानंतर विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक नगरधन किल्ला तसेच रामटेक येथील राम मंदिरास भेट दिली. या भेटीद्वारे विद्यार्थ्यांना ऐतिहासिक, सांस्कृतिक व धार्मिक स्थळांची माहिती मिळाली. सदर शैक्षणिक सहलीमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवून सहलीचा आनंद घेतला. वाणिज्य शाखेच्या सर्व शिक्षकांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन सहलीचे नियोजन व आयोजन यशस्वी केले. या औद्योगिक भेटी व शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उद्योगविश्व, इतिहास, संस्कृती आणि प्रत्यक्ष अनुभवातून अनेक नवीन गोष्टी शिकण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांसाठी ही सहल ज्ञानवर्धक, प्रेरणादायी व अविस्मरणीय ठरली.

## प्रवरा मेडिकल हॉस्पिटलबाहेर प्रवासी व रुग्णांसाठी सुसज्ज 'बस शेड' उभारा

### डॉ. दत्ता विघावे यांची प्रवरा मेडिकल ट्रस्टकडे मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, लोणी**

प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या लोणी येथील हॉस्पिटलसमोरील मुख्य रस्त्याच्या दुतर्फा रुग्ण व प्रवाशांच्या सोयीसाठी सर्व सोयी-सुविधांयुक्त 'प्रवासी निवारा' (बस शेड) उभारण्यात यावा, अशी आग्रही मागणी 'डब्ल्यूसीपीए'चे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष, समाजभूषण डॉ. दत्ता विघावे यांनी निवेदनाद्वारे केली आहे. याबाबत त्यांनी प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या चेअरमन व विश्वस्त मंडळाला अधिकृत पत्र पाठवले आहे.

**रुग्ण व नातेवाइकांचे हाल थांबावेत**



प्रवरा मेडिकल ट्रस्ट व हॉस्पिटलच्या माध्यमातून ग्रामीण भागात अविरतपणे उच्च दर्जाची आरोग्य सेवा दिली जात आहे. या सेवेचा लाभ घेण्यासाठी संपूर्ण राज्यातून दररोज हजारो रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक लोणी येथे येतात. उपचारासाठी येणारे-जाणारे बहुतांश नागरिक एसटी बस अथवा इतर सार्वजनिक वाहनांवर अवलंबून असतात. परंतु, हॉस्पिटलबाहेरील मुख्य रस्त्यावर दोन्ही बाजूंना पुरेशी सावली किंवा बसण्यासाठी प्रवासी शेड उपलब्ध नाही. त्यामुळे वाहनांची वाट पाहताना रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांना रस्त्यावर उघड्यावरच ताटकळत उभे राहावे लागते.

**ऊन-पावसाचा बसतोय मोठा फटका**

कडक ऊन, वादळी वारा तसेच मुसळधार पावसात वृद्ध, अशक्त आणि गंभीर आजारांतून नुकतेच बरे झालेले रुग्ण जास्त वेळ उभे राहू शकत नाहीत. परिणामी, त्यांना मोठ्या शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागते. हा त्रास टाळण्यासाठी सामाजिक व मानवीय दृष्टिकोनातून हॉस्पिटल समोरील रस्त्याच्या दोन्ही बाजूंना बैठक व्यवस्थेसह सुसज्ज असे 'बस स्टँड / प्रवासी शेड' तात्काळ उभारण्यात यावे, अशी मागणी डॉ. विघावे यांनी केली आहे.

प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या रुग्णोपयोगी सेवाकार्यात या उपक्रमामुळे आणखी एक मोलाची भर पडेल, असा विश्वासही डॉ. विघावे यांनी निवेदनात व्यक्त केला आहे.

## नागपूरकरांनी सैनिकांना राख्या पाठवून दिल्या दीर्घायुष्याच्या शुभेच्छा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मागील २० वर्षांपासून नागपूरकरांनी देशाच्या सीमेवर रक्षण करणाऱ्या सैनिक बांधवांसाठी स्वतः राख्या बनवून सैनिकांना पाठवून दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या या उपक्रमासाठी नागपूरकरांचे संयोजक डॉ. निखिल भुते यांच्या पुढाकाराने नागपुरातील सामाजिक आध्यात्मिक महाविद्यालयीन सांस्कृतिक क्रीडा व सैनिक संघटनांच्या संकल्पनेतून इंडियन आर्मीए कारगिल पोस्ट लदाख भारतीय बोर्डवरील सैनिकांसाठी नागपूरकरांच्यावतीने नागपूर महाराज राजे मुधोजी महाराज भोसले यांच्या प्रमुख हस्ते विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत नागपूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद साहेब यांच्या माध्यमातून पाठविण्यात आल्या देशाच्या सीमेवर २४ तास पहारा



देऊन देशातील सर्व नागरिकांचे रक्षण करणाऱ्या सैनिकांना राख्या पाठवून त्यांच्या कायार्ला सलाम करून प्रत्येक नागपूरकरांचे कर्तव्य आहे. नागपूरकरांतर्फे दरवर्षी हा उपक्रम राबविण्यात येत असून या वर्षी या अभियानांतर्गत सैनिकांसाठी राखी पाठवून त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात येत आहे.

देशाच्या सीमेवर अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या भारतीय जवानांप्रती आदर, कृतज्ञता व देशभक्तीची भावना व्यक्त करण्यासाठी आम्ही नागपूरकर व तायवाडे कॉलेज, तायवाडे कॉलेज ऑफ फार्मसी व तायवाडे कॉलेज ऑफ नर्सिंग, आणि विविध सामाजिक संस्था व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राखी संकलनाचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाला नागपूरकरांसह विविध सामाजिक संघटना व महिला संघटनांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत जवानांसाठी राख्या उपलब्ध करून दिल्या.

विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच विविध सामाजिक संघटना, महिला संघटना आणि नागपूरकरांनी देशाच्या सीमेवर तैनात असलेल्या सैनिकांसाठी प्रेम, आपुलकी आणि देशभक्तीच्या भावनेतून राख्या तयार केल्या आहेत. या राख्या कारगिल पोस्ट, लदाख येथे तैनात असलेल्या भारतीय जवानांपर्यंत पोहोचविण्याचा महाविद्यालयाचा मानस आहे. या देशभक्तीपर उपक्रमाबद्दल महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. बबनरावजी तायवाडे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी व नागपूरकरांनी जवानांसाठी व्यक्त केलेले प्रेम व आपुलकी ही निश्चितच कौतुकास्पद असून, सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांपर्यंत हा प्रेमाचा धागा पोहोचविण्याचे कार्य नागपूरकर व महाविद्यालयाच्या माध्यमातून होत असल्याचे त्यांनी सांगितले.

या अनुषंगाने नागपूरकंरानी सदर राख्या जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे सुपूर्द करण्यात येणार आहेत.

या राख्या कारगिल पोस्ट, लदाख येथील जवानांपर्यंत पोहोचविण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाच्या माध्यमातून करण्यात यावी, अशी विनंती नागपूरकरच्या वतीने करण्यात आली आहे. याप्रसंगी राजे मुधोजी महाराज भोसले, कार्यक्रमाचे संयोजक डॉ. निखिल भुते, माजी उपमहापौर व नगरसेवक किशोर कुमेरीया, प्राचार्य डॉ.गीता लोधी, प्रा. विक्रांत चिलाटे, प्रा.डॉ.वंदना ठणगावले, डॉ. वर्षा वैद्य, कमलेश माचेवार, अभिजीत दरवडे सामाजिक कार्यकर्ते राहुल गुप्ता, पंकज बांन्ते व विविध क्षेत्रातील मान्यवर प्रामुख्याने उपस्थित राहून कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना राखी बांधून दीघार्युष्याच्या शुभेच्छा नागपूरकरानी दिल्या. कार्यक्रमाचे संचालन डॉ. निखिल भुते, प्रास्ताविक डॉ. वर्षा वैद्य, आभार प्रदर्शन कमलेश माचेवार यांनी केले, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आम्ही नागपूरकर पदाधिकारी आणि तायवाडे कॉलेजचे विद्यार्थी आणि विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी रात्र - दिवस अथक परिश्रम केले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# प्राचीन मंदिरे व ऐतिहासिक तलावाचा वारसा जपणारे "बाजारगाव"

**भ्रमंती**



गणेश पांडे, नागपूर

नागपूर पासून अमरावती महामार्गावर ४० कीलोमीटर अंतरावर वसलेले बाजारगांव हे चहु बाजुंनी हिरवाईने नटलेल्या निसर्गाच्या कुशीत वसलेले एक शांत सुंदर रमणीय स्थळ तसेच अनेक पुरातन मंदिरांचा वारसा आपल्या अंगा खांद्यावर बाळगून असलेले परंतु आजच्या घडीला काहीसे दुर्लक्षित व धार्मिक आणि निसर्ग पर्यटनाच्या दृष्टीने यथोचित प्रसिद्धी व ओळख न लाभलेले एक ऐतिहासिक, धार्मिक व निसर्ग ठीकाण आहे व त्या अनुषंगाने 'बाजारगांव' ची हि प्राचीन ऐतिहासिक स्थळ व तीर्थक्षेत्र म्हणून आज पुन्हा नव्याने ओळख ताजी करणारी व पर्यटन दृष्ट्या भेट देण्यासारखी अशी ही खालील काही ठिकाणे.

**(१) भोसले कालीन विस्तिर्ण तलाव:-** बाजारगाव ला पर्यटनस्थळ म्हणून खऱ्या अर्थाने ओळख देणारा हा सुंदर शांत व विस्तीर्ण जलाशय चहुबाजूंनी हिरव्यागार वृक्षराजी व डोंगरानी वेढलेला असून हा नागपूर च्या राजे भोसले यांच्या काळातील असल्याचे सांगितले जाते. पाण्याची साठवणूक व गावांच्या जलपुर्ती च्या गरजा पूर्ण करण्यासाठी भोसले राजांनी त्या काळी ठीकठीकाणी बांधलेल्या विविध जलस्त्रोतां प्रमाणेच बाजारगाव येथील या विशाल तलावाची निर्मिती केली असल्याचे मानले जाते. तळ्याकाठचा परीसर अतिशय स्वच्छ, शांत व रमणीय आहे, संपूर्ण तळ्याभोवती संरक्षक कठडे उभारलेले आहेत व परीसरात पक्षांचा मधुर कीलबिलाट आनंददायी मन प्रसन्न करणारा असतो, तलाव परीसरात प्रवेश करतांनाच आरंभीच दोन मंदिरे आहेत जी गणेशाची व हनुमानाची सुंदर व सुबक मूर्ती असलेली मंदिरे आहेत. चहुबाजूंनी हिरवाईचे कोंदण घेऊन मनाला आनंदाची अनुभुती देणारा बाजारगाव येथील हा सुंदर तलाव अलिकडे पर्यटनाच्या दृष्टीने व सहलीसाठी पर्यटकांचे आकर्षण ठरत आहे.





**(२) गणेश मंदिर:-** बाजारगाव तलावाच्या काठावर असलेले हे सुंदर गणेश मंदिर अतिशय देखणे व आकर्षक आहे आणि मंदिरातील गणेशाची मूर्ती तेवढीच सुबक, रेखीव व देखणी आहे . मंदिर परिसरात स्वच्छता असल्याने, गणेश दर्शन सुखदायी व आनंददायी वाटते.

**(३) हनुमान मंदिर:-** तलावाच्या काठावरच असलेल्या गणेश मंदिरा समोरच असलेले हे हनुमान मंदिर सुद्धा तेवढेच सुबक व सुंदर आहे.या दोन्ही मंदिरामुळे तलाव परिसराचे सौंदर्य मनमोहक व खुलून दिसणारे व मन प्रसन्नतेने भरुन टाकणारे आहे.

**(४) शिव मंदिर:-** बाजारगाव येथील शांत रम्य परिसरात असलेले हे प्राचीन शिव मंदिर त्याच्या भव्यते वरून आपल्या गत वैभवाची साक्ष देत उभे आहे व परीसरातील श्रद्धाळूं वर भक्तांसाठी धार्मिक आस्थेचे ठिकाण आहे.

**(५) बालाजी मंदिर:-** शिव मंदिरा प्रमाणेच पुरातन असलेले बाजारगाव येथील बालाजी मंदिर हे आणखी एक श्रद्धाळुंचे धार्मिक आस्थेचे ठीकाण. बालाजी मंदिर परिसर हा मुख्य मंदिरा सोबतच आणखी तीन लहान मंदिरे असलेला मंदिरांचा समूह आहे व बाजारगावची गत काळातील एक प्रमुख धार्मिक तिर्थक्षेत्र असल्याची ओळख देत उभा आहे.

**(६) राम मंदिर:-** बाजारगाव येथील प्राचीन मंदिरां पैकी एक असलेले प्रभु श्रीरामाचे हे एक जुने मंदिर. प्रभू राम, लक्ष्मण व सीता यांच्या सुंदर व सुबक मुर्ती असलेले हे राम मंदिर येथे भेट देण्यासाठी भाविकांचे एक पवित्र श्रध्दास्थान आहे.

**(७) निळकंठेश्वर शिव मंदिर:-** बाजारगाव येथील जरा गावाच्या बाहेर निसर्गरम्य परिसरात असलेले निळकंठेश्वर शिव मंदिर येथील शांत वातावरण व रमणीयतेमुळे मनाला शिव दर्शनाचा आनंद व प्रसन्नता देणारे पुज्य धार्मिक स्थळ आहे.

**(८) जैन मंदिर (आदिश्वर धाम):-** बाजारगाव येथील आदिश्वर धाम जैन मंदिर हे जैन धर्मियांचे पवित्र मंदिर व श्रद्धा स्थळ आहे. या मंदिराचा इतिहास १००० वर्ष जुना असून, अगदी अलीकडेच या जुन्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला असून मंदिराला आधुनिक व भव्य स्वरूप देण्यात आले आहे व संपूर्ण मंदिर परीसर नवीन बांधकाम करून सुंदर व सुशोभित करण्यात आला आहे, जो खरोखरच आकर्षक आहे.

**(९) विठ्ठल रखुमाई मंदिर: -** बाजारगाव येथील साधारणतः १०० वर्ष जुने असलेले विठ्ठल रखुमाई देवस्थान हे येथील ग्रामस्थांचे दैवत व श्रद्धास्थान आहे. आषाढी एकादशी व कार्तिकी एकादशीनिमित्त मंदिरात विशेष पूजा, भजन आणि कीर्तनाचे कार्यक्रम होतात. स्थानिक वारकरी व भाविक गर्दी करतात.

वरील प्राचीन व मध्ययुगीन वारसा जपणारी धार्मिक स्थळे व शांत, सुंदर नयनरम्य परीसर लाभलेला भोसले कालीन तलाव या व्यतिरिक्त हि जून्या काळात बाजार गावची ओळख माती कलेसाठी प्रसिद्ध होती व निरनिराळी कलाकारी केलेली मातीची सुबक भांडी यासाठी बाजारगाव येथील 'कुंभारपुरा' हा बहुसंख्य कुंभार वस्ती असलेला पुरा वा मोहल्ला पंचक्रोशीतील गावांमध्ये प्रसिद्ध होता, परंतु बदलत्या काळानुसार व परिस्थितीनुसार हि ओळख काहिशी पुसट झाली आहे.

सध्या बाजारगाव हे नागपूर-अमरावती महामार्गावर एक महत्त्वाचा थांबा असलेले नगर आहे व परीसरातील आजुबाजूच्या गावांसाठी दैनंदिन व्यवहारासाठी व गरजांसाठी एक महत्त्वाचे खरेदी विक्री व वाणिज्यिक ठिकाण आहे. तसेच येथे अलीकडील काळात निर्माण झालेल्या 'स्टार की पॉईंट' व 'फन अॅन्ड फुड व्हीलेज' सारख्या थल ,जल व साहसिक पर्यटनाच्या सुविधा असलेल्या आधुनिक पर्यटक आकर्षण केंद्रांमुळे मुख्यतः नागपूर व आसपासच्या पर्यटन जगतात प्रसिद्ध पावले आहे व पर्यटन प्रेमी एक दिवसीय सहलीसाठी या ठिकाणी भेट देण्यासाठी येत असतात, तसेच बाजारगाव सध्या तेथे असलेल्या "सोलर एक्सप्लोसिव" या बारूद व स्फोटक निर्माण कारखान्यामुळे देशात प्रसिद्धीस आले आहे. परंतु खंया अर्थाने आपला प्राचीन सांस्कृतिक व धार्मिक वारसा जतन करून व पुरातत्व विभागाचा 'क 'वर्गाच्या पर्यटन स्थळाचा दर्जा असूनही, अजूनही या ठीकाणाची एक ऐतिहासिक व प्राचीन वारसा लाभलेले पर्यटन स्थळ म्हणून पाहिजे तशी ओळख वा दखल मात्र पर्यटन जगतात दुर्दैवाने घेतल्या गेली नाही हे वास्तव आहे व या दृष्टीने नव्याने 'बाजारगावंची' ओळख धार्मिक व निसर्ग पर्यटन प्रेमींना व्हावी यासाठी हा लेखन प्रपंच. मित्रांनो आपण जर विदर्भात व विशेषतः नागपूर व आसपासच्या परिसरात राहणारे असाल तर नक्कीच बाजारगाव येथे आपल्या पूर्वजांनी निर्माण केलेल्या या प्राचीन मंदिर व तलाव रुपी वारसा स्थळांना भेट देण्यासाठी एक दिवसीय धार्मिक व निसर्ग पर्यटन सहलीचा आनंद आपण घ्यायलाच पाहिजे.

- ९५०३३५०५७४

# वस्तीतील लहान रस्तेही सुरक्षित नाहीतच!

**वाचक पत्र**

एम.व्ही. सोलंके

शहरात विकासाचे वारे वेगाने वाहत आहेत. कुठे सिमेंटचे रस्ते, कुठे डांबरीकरण, कुठे उड्डाणपूल, तर कुठे पाईपलाईन आणि विविध विकासकामांची लगबग. शहराचा चेहरामोहरा बदलण्याचे प्रयत्न सर्वत्र सुरू आहेत. कोट्यवधींचा निधी खर्च करून शहर अधिक सुंदर, आधुनिक आणि गतिमान करण्याचे स्वप्न पाहिले जात आहे. मात्र या विकासाच्या गदारोळात एक मूलभूत प्रश्न अनुत्तरितच राहतोय. या रस्त्यांवरून चालणारा सामान्य नागरिक सुरक्षित आहे का?

मुख्य मार्गांवर तर 'बचके रहना रे बाबा' म्हणत प्रवास करण्याची वेळ अनेकदा येतेच; पण आता वस्त्यांमधील छोटे-मोठे रस्तेही सुरक्षित राहिलेले नाहीत. पूर्वी गल्लीबोळ म्हणजे लहान मुले खेळण्याची, ज्येष्ठ नागरिक निवांत फेरफटका मारण्याची आणि शेजाऱ्यांनी एकमेकांशी संवाद साधण्याची सुरक्षित जागा मानली जायची. आता मात्र याच रस्त्यांवरून वाहने सुसाट वेगाने धावताना दिसतात.

विशेषतः काही तरुण वाहनचालकांना रस्त्यावरील वेगाची मर्यादा, समोरची वस्ती किंवा रस्त्यालगत खेळणारी मुले याचे भानच नसल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसते. हातात वाहनाचे स्टेअरिंग आणि पायाखाली वेगाचे नियंत्रण असताना समोरच्या माणसाच्या जीवाची किंमत मात्र विसरली जाते. 'रस्ता मोकळा आहे म्हणजे वेग वाढवायचा' ही मानसिकता कधी कोणाच्या घरातील दिवा विझवेल, याचा नेम नसतो.

दक्षिण नागपुरातील महाकाली नगर परिसरात घडलेल्या दुर्दैवी घटनेने याच वास्तवाला पुन्हा एकदा काळजाचा ठाव घेतला. घरासमोर खेळत असलेल्या एका चिमुकलीला बेजबाबदार वाहनचालकाच्या वेगाने आपला जीव गमवावा लागला. एका क्षणाच्या बेफिकीरीने एका कुटुंबाचे आयुष्य उद्ध्वस्त झाले. अंगणात खेळणाऱ्या त्या चिमुकलीचा निरागस हसरा चेहरा क्षणात आठवणीत बदलला आणि घरातील आनंदावर कायमचे दुःखाचे सावट पसरले.

ही घटना दुर्दैवाने अपवाद नाही. वस्त्यांमधील अरुंद किंवा तुलनेने मोकळ्या रस्त्यांवर वेगाने वाहने चालविण्याचे प्रकार वारंवार घडतात. ज्येष्ठ नागरिक रस्ता ओलांडताना, शाळेत जाणारी मुले रस्त्याच्या कडेला चालताना किंवा घरासमोर खेळणारी चिमुकली मुले यापैकी कोणाच्याही आयुष्याचा शेवट एका क्षणाच्या बेदरकार वेगामुळे होऊ शकतो. मग प्रश्न उपस्थित होतो, वस्तीतील लांब आणि सरळ रस्त्यांवर वेग नियंत्रित करण्यासाठी काही उपाययोजना करता येणार नाहीत का?

अनेक ठिकाणी स्पीड ब्रेकर, रंबल स्ट्रिप्स, चेतावणी फलक, रिफ्लेक्टर किंवा वेगमर्यादेचे स्पष्ट संकेत लावले, तर वाहनचालकांना किमान वेग कमी करण्याची जाणीव होऊ शकते. मात्र काही ठिकाणी न्यायालयाच्या आदेशामुळे स्पीड



ब्रेकर लावता येत नसल्याचे सांगितले जाते. वाहतूक सुरळीत ठेवणे, अपघात टाळणे आणि नागरिकांच्या जीविताचे रक्षण करणे या उद्देशाने नियम असतील, तर त्या नियमांची अंमलबजावणी करतानाही स्थानिक परिस्थितीचा विचार होणे तितकेच आवश्यक आहे.

कायदा जनतेसाठी आहे की जनता कायद्यासाठी? हा प्रश्न येथे उपस्थित होतो. कायदा पाळलाच पाहिजे; मात्र कायद्याच्या चौकटीत राहून नागरिकांचे प्राण वाचविण्यासाठी पर्यायी आणि प्रभावी उपाय शोधणे ही प्रशासनाची जबाबदारी नाही काय?

स्पीड ब्रेकर शक्य नसतील तर वेग नियंत्रित करण्यासाठी इतर वैज्ञानिक उपाययोजना करता येतील. शाळा, अंगणवाडी, मंदिरे, बाजारपेठा आणि दाट वस्त्यांच्या परिसरात विशेष वेगमर्यादा लागू करता येईल. 'स्लो ड्राइव्ह', 'पुढे वस्ती आहे', 'लहान मुले खेळतात' असे फलक लावता येतील. आवश्यक ठिकाणी रंबल स्ट्रिप्स, रस्त्यावरील मार्किंग, सीसीटीव्ही आणि वाहतूक पोलिसांची नियमित गस्त वाढविता येईल. कारण अपघात झाल्यानंतर पंचनामा, चौकशी, मदत, शोकसभा आणि सांत्वनाचे शब्द उपयोगी पडतात; पण गेलेला जीव परत आणता येत नाही.

रस्त्यांच्या निर्मितीसाठी कोट्यवधी रुपये खर्च करणारे प्रशासन जर नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी काही लाख रुपये खर्च करून प्रतिबंधात्मक उपाययोजना करू शकत असेल, तर त्यात गैर काय? विकास म्हणजे केवळ रुंद रस्ते, आकर्षक चौक आणि उड्डाणपूल नव्हेत. ज्या रस्त्यावरून नागरिक निर्धास्तपणे चालू शकतो, ज्या गल्लीत मूल सुरक्षितपणे खेळू शकते आणि जिथे ज्येष्ठ नागरिकांना जीव मुठीत धरून रस्ता ओलांडावा लागत नाही, तोच खरा विकास !प्रशासनाने एखादी गंभीर घटना घडल्यानंतर जागे होण्यापेक्षा त्याआधीच संभाव्य धोकादायक ठिकाणांची पाहणी करून उपाययोजना करणे गरजेचे आहे.

प्रत्येक वस्तीत 'अपघात होण्याची वाट पाहणारा' रस्ता शोधण्यापेक्षा 'अपघात होऊ नये' यासाठी नियोजन करणे अधिक शहाणपणाचे आहे. शहराच्या विकासाची गती वाढू द्या; रस्ते अधिक चांगले होऊ द्या. पण त्या विकासाच्या चाकाखाली एखाद्या निष्पाप चिमुकल्याचे बालपण, एखाद्या आईचे मातृत्व किंवा एखाद्या कुटुंबाचा आधार चिरडला जाऊ नये.

# मुक्ती : विदारक वास्तव टिपणारी कलाकृती




प्रा. सुलभा अमृत चौधरी
यशवंत कॉलनी वर्धा.

**मुक्ती : कादंबरी**
**प्रकाशक : सुधीर प्रकाशन वर्धा.**

लेखिका कल्पना नरांजे लिखित मुक्ती ही कादंबरी नुकतीच वाचनात आली. ही कादंबरी सुधीर प्रकाशन वर्धा यांनी प्रकाशित केलेली आहे. २०० पृष्ठाच्या या कादंबरीत लेखिकेने व्यसनांच्या विळख्यात सापडलेल्या तरुणाईचा ज्वलंत प्रश्न मांडला आहे. बेरोजगारीचा प्रश्नही अधोरेखित केला आहे. त्याचप्रमाणे विस्थापितांच्या व्यथाही या कादंबरीत जाणवतात. या कादंबरीत लेखिकेने प्रामुख्याने दारूच्या विघातक व्यसनाचे व्यक्ती कुटुंब आणि एकूणच समाजावर होणारे दुष्परिणाम अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे. या व्यसनामुळे गरीब कष्टकरी लोकांचे जीवन तर उध्वस्त होतेच. परंतु श्रीमंत लोकही सुखी राहत नाही. त्यांची ही वाटचाल अधोगतीकडेच होते .सुरुवातीला माणूस मौज म्हणून दारू पितो ,तर कोणी दुःख आणि निराशा विसरण्यासाठी पितो .पुढे जास्त व्यसन वाढल्यानंतर दारूच माणसाला प्यायला लागते. दारुड्याच्या नसीबी आर्थिक विवंचना, कुटुंबीयांची आबाळ, रोगग्रस्त शरीर आणि शेवटी अकाली मृत्यू याशिवाय काहीही येत नाही. हाच मुख्य धागा पकडून लेखिकेने मुक्ती ही कादंबरी लिहिली आहे. शेवटी व्यसनाधीनांना व्यसनापासून मुक्त करण्याचा मार्गही त्यांनी सुचविला आहे.

मुक्ती या कादंबरीत लेखिकेने ग्रामीण जीवनाचा पट मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या कादंबरीत उत्तम हे मुख्य पात्र आहे, तर सोपान हे उपपात्र आहे. दोघेही शेतकरी कुटुंबातील तरुण आहेत. सोपान इंजिनियर होऊनही बेकारच आहे. तर उत्तम ने बारावी पास होऊन इलेक्ट्रिशियनच ट्रेनिंग घेतलेल आहे. दोघेही एकुलते एक. त्यांचे वडील शेतकरी असूनही आपल्या मुलांनी ओल्या मातीतील कष्ट उपसू नये तर नोकरी करावी ,शहरात राहावे या विचारसरणीचे आहे. या विचारसरणीतूनच तरुण वर्ग शहरात मिळेल ती नोकरी स्वीकारतो. वडीलोपार्जित शेती आणि उद्योगाकडे पाठ फिरवतो. ही विचारसरणी शेती आणि शेतकऱ्यांच्या विनाशाला कारणीभूत ठरते हे सत्य लेखिका अधोरेखित करते. उत्तम सुशिक्षित बेकार म्हणून स्वतःची एम्प्लॉयमेंट ऑफिसमध्ये नोंदणी करतो. एके दिवशी त्याला पोलीस खात्यात टेम्परर क्लार्कची नोकरी गावातच मिळते. दोन वर्षांनी नोकरी पक्की होईल या अशेवर असताना अनुभव म्हणून एकदा तो दारूभट्टीवरील चोरीचा माल पकडायला टिम सोबत जातो. परत येताना हवालदार लंकेश त्याला आपल्या घरी नेऊन जिव्हाळ्याचे नाते दाखवत दारू पिण्याचा आग्रह करतो. नाही नाही म्हणत असताना दारूचा पहिला घोट घेतो. त्यानंतर तो व्यसनांच्या विळख्यात कसा अडकतो त्याचं त्यालाच कळत नाही. पुढे शुभांगीशी त्याचा विवाह होतो. काही दिवसानंतर धरणासाठी संपूर्ण गावच सरकार अधिग्रहित करते. शेतजमिनीचा पैसा आणि विस्थापितांना बाजूच्या गावातील माळरानावर जागा मिळते.

पैसा हाती येताच उत्तमचा संसार शहरात स्थलांतरित होतो. आई-वडील मात्र मिळालेल्या जागेवर टीनाच्या खोल्या बांधून राहू लागतात. सोपानचही स्थलांतर शहरात होतं. आयता पैसा हाती असल्यामुळे व्यसन अधिकच वाढतं. सुरुवातीला पैसा जास्त असल्यामुळे शुभांगीला त्याचं काहीच वाटत नाही. पैसा असल्यामुळे तिला आणि उत्तम ला तिच्या माहेरी खूपच मान असतो. व्यसनाच्या आहारी गेल्यावर उत्तमच व्यवसायाकडे दुर्लक्ष होतं. व्यवसाय मोडतो. पैसा संपत येतो. तेव्हा शुभांगीला गरिबीची झळ पोचते. पैसा संपल्याबरोबर नातलगांच्या व्यवहारातही बदल होतो. कोणीही त्यांना जवळ उभा करीत नाही. मुलांची आबाळ सुरू होते. त्यांच्या शिक्षणासाठीही पैसा नसतो. तेव्हा नाईलाजाने शुभांगी टोपल्यातून गृह उपयोगी सामान विकत दारोदारी फिरते, आणि फाटका संसार शिवण्याचे काम करते. अति दारू सेवनामुळे उत्तमच शरीर विविध रोखांनी पोखरायला लागतं. कमाई तर पूर्णपणे बंदच असते. त्यामुळे दैनंदिन गरजा भागविणे कठीण होतं. अशा वेळी शुभांगीला माहेरी आसरा मिळत नाही. दारुड्याच्या पत्नीला समाजात नातलगात किंमत नसते याचा तिला अनुभव यायला लागतो. अनुभवांती ती शहाणी होते. मनापासून प्रेम करणारे सासू-सासरे तिला आठवतात.

उत्तम आणि सोपान दोघांनाही त्यांचे आई वडील व्यसनमुक्ती केंद्रात ठेवतात. तेथील एकेका व्यसनाधीनाची कथा हृदयाला पिळ पाडणारी आहे. जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही, या म्हणीप्रमाणे इंजिनियर सोपान व्यसनमुक्ती केंद्रातून परत आल्यानंतर मनसोक्त दारू पितो आणि प्राणास मुकतो. ती घटना सहन न होऊन त्याचे वडील हार्ट फेल होऊन स्वर्गवासी होतात. म्हातारी आई गावातील खोपटात मरनाची वाट पाहत असते.

व्यसनमुक्ती केंद्रातून घरी आल्यानंतर उत्तमलाही दारू प्यावीसी वाटते. पण सोपानच्या मरणाची बातमी एकूण त्याच्या डोक्यात प्रकाश पडतो. दारूच्या व्यसनापासून स्वतःला मुक्त करण्याचा तो निर्णय घेतो. शुभांगीलाही आता गावी हक्काच्या घरी राहण्याची उपरती होते. एकाच ठेच दुसरा शहाणा असा या कादंबरीचा मतितार्थ आहे. एकदा कादंबरी हातात घेतली की ती वाचकाला झपाटून टाकते. पुढे काय घडते याची उत्सुकता मनास लागून राहते. हेच या कादंबरीचे बलस्थान आणि यशही आहे. सामाजिक मानसशास्त्राचा वेध घेणारी लेखिकेची शैली सहज आणि प्रवाही आहे. मानवी नात्यांमधील आटत चाललेला जिव्हाळा, व्यसनाधीनतेचे विनाशकारी परिणाम, त्याबरोबरच व्यसनींना सुधारण्यासाठी व्यसनमुक्ती केंद्र सारखे मार्ग या कादंबरीत सुचविलेले आहे आणि तेच कथानकाचे ठळक वैशिष्ट्य आहे. लेखिका माझी माजी विद्यार्थिनी आहे. एकदा सहज मी तिला लेखनाचा सल्ला दिला होता. तो मनावर घेऊन ती झपाटल्यासारखी लिहिते आहे. लेखनाच्या क्षेत्रातील तिचं यश बघून ती माझी विद्यार्थिनी असल्याचा मला अभिमान वाटतो. लेखनाच्या क्षेत्रात उत्तरोत्तर तिची नेत्रदीपक प्रगती होत राहो हीच शुभकामना.

दैनिक सिंहवाणी वृत्त



थोडक्यात

## पारशिवनी येथे विद्यार्थिनीची आत्महत्या

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारशिवनी येथील मृनाली लालचंद जुनघरे वय १७ वर्ष. या वर्ग १२ वित शिकत असलेल्या विद्यार्थिनी आज दिनांक २६ ऑगस्ट



ला दुपारी १२ च्या सुमारास राहत्या घरी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. मृनाली लालचंद जुनघरे १७ वर्ष ही वर्ग १२ विची नियमित विद्यार्थीनी होती. आज दिनांक २६ ऑगस्टला आई वडील मजूरीच्या कामाला गेले असता सदर विद्याथीर्नीने राहत्या घरी विषारी औषध प्राशन करून जनावरांच्या गोठ्यात जावून झोपली. पण आजीला विषारी औषधाचा वास आला तेव्हा गोठ्यात जावून पाहिले तर नातीने विषारी औषध प्राशन केले असल्याचे लक्षात येताच तात्काळ ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

वैद्यकीय अधिकारी यांनी उपचार सुरू केले पण सदर मुलगी उपचाराला प्रतिसाद देत नसल्याने तिला पुढील उपचारासाठी नागपूर मेयो रुग्णालयात पाठविण्यात आले असता उपचारा दरम्यान दुपारी २ ते ३ वाजताच्या दरम्यान तिचा मृत्यू झाला. या घटने नंतर परीसरात शोककळा पसरली. मात्र आत्महत्या कोणत्या कारणाने केली हे अधिकृतपणे कळले नाही. घरच्यांनी सदर मुलीला व नातलगांनी समजावून सांगितले. पण अखेर मुलीने आपला हट्ट सोडला नाही. त्यामुळे आई वडील व नातलगांनी अखेर हार मानली. अल्पवयीन असल्याने ती लग्न करू शकणार नाही यांचे निराशेतून मुलीने आत्महत्या केली असावी असा अंदाज आहे. या प्रकरणी पारशिवनी पोलीस आत्महत्येचे कारण तपासा अंती कळेल.

## मुलुखमैदानी तोफ प्रकाश कांबळे यांच्या वाढदिवसानिमित्त संकल्प, मध्यवर्ती बसस्थानकाला डॉ. आंबेडकर नाव द्यावेत : बागडे



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

गणेश पेठ मध्यवर्ती बसस्थानक परिसराचा आजुबाजूला आंबेडकरी समाजाचा बालेकिल्ला आहेत उदा. रामबाग, इमामवाडा, उंटखाना, मॅडल मिल्स चाल इत्यादी वस्ता आहेत इतकेच नव्हे तर बसस्थानकावर ऑटोचालक ई रिक्षाचालक, कामगार, फूटपाथवर दुकानदाराची व्यवसायाची चाल आहे ईथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, धम्मचक्र परिवर्तन कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर होत असतात त्यामुळे इथल्या नागरिकांकडून वारंवार हि मागणी उठत असते त्यांचा भावनेचा आदर म्हणून गणेश पेठ मध्यवर्ती बसस्थानकाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावेत. अशी मागणी आंबेडकरी रिपब्लिकन मोचार्चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी केली. ते आंबेडकरी चळवळीतील मुलुखमैदानी तोफ प्रकाश कांबळे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सत्कार करतांना प्रमुख पाहूणे म्हणून बोलत होते.

प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्रावर धम्म सेनेचे नेते रवीभाऊ शेंडे यांनी पुष्पहार अर्पण केले तर धमार्जी बागडे यांनी दीपप्रज्वलन केले सचिन नगराळे, प्रा. रमेश दुपारे, धनराज बागडे, जयदेव चिंवडे. हंसराज उरकुडे. राजु कांबळे, अमर भाऊ, यांनी सत्कार मुर्ती यांच्या शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला कार्यक्रमाचे आयोजन प्रज्योत कांबळे आणि मित्रमंडळी यांनी केला याप्रसंगी बसस्थानक परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## सरपंच भवन नागपूर येथे महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट ब राजपात्रित विभागीय संघटनेची आमसभा संपन्न




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सरपंच भवन नागपूर येथे महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट ब राजपात्रित विभागीय संघटनेची आमसभा पार पडली. दीप प्रज्वलन करून आमसभेची सुरुवात करण्यात आली. आमसभेच्या अध्यक्षपदी योगेश दांदळे प्रमुख कार्यवाहक केंद्रीय संघटना मुंबई तर दिनेश चंद्र राजुरकर विभागीय अध्यक्ष अमरावती हे प्रमुख पाहुणे म्हणून आमसभेस उपस्थित होते. सदर आमसभेत मागील आमसभेचे इतिवृत्त वाचन आणि मंजुरी. आर्थिक वषार्चा जमा खर्च मंजूर करणे, विभागीय कार्यकारणी मधील रिक्त पदे भरणे बाबत कार्यवाही करण्यात आली. तसेंच कोर्ट केस व पदोन्नती बाबत चर्चा करण्यात आली.

संघटनेत नवीन आलेले सहाय्यक लेखाधिकारी यांची सभासद नोंदणी करण्यात आली व अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषयांवर साधक-बाधक चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजय संघरक्षित तर प्रस्तावना विनोद बोरघाटे यांनी केली. मागील वषार्चा संपूर्ण लेखाजोखा उत्तम गलानी विभागीय अध्यक्ष यांनी सर्वासमोर सादर केला. केंद्रीय संघटनेच्या वाटचालीबाबत विस्तृत विवेचन निलेश बोनगिरवार केंद्रीय समन्वयक यांनी केले. आमसभेस स्वाती दारुणकर केंद्रीय कार्याध्यक्ष तर रवींद्र तायडे अमरावती विभागीय सचिव उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आरती राठोड यांनी केले. राज्य गाणानंतर नंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता रुपेश गायधने, विजय गाठे, संजय बुलबुले, प्रवीण रीनके, सचिन आईलवार, मनीषा हटवार, संजय पोलके, राजेश बेलोरकर, शुभांगी रामटेके, इत्यादी उपस्थित होते.

# जुगार धाडीतील जप्तीवर प्रश्नचिन्ह ?

## प्रत्यक्ष जप्तीची संपूर्ण नोंद सार्वजनिक होणार का? माहिती अधिकार अधिनियमात कागदोपत्री माहीतीची मागणी



### प्रकरणात माहिती अधिकार अर्जाचा वापर

दि.२९ ऑगस्ट रोजी उघडकीस आलेल्या सदर जुगार स्थळावर सावनेर पोलीसांनी केलेल्या कारवाई ची सविस्तर माहीती समाजसेवी राजेश खंगारे यांन माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज सादर करूण मागीतली आहे.त्यात सदर कारवाई संदर्भात गुन्हा व प्रथम माहिती अहवाल, अटक करण्यात आलेल्या आरोपी बद्दल संपूर्ण माहीती, जप्ती पंचनामा, जप्त केलेल्या मोबाईल फोन संदर्भात संपूर्ण माहिती, जप्त करण्यात आलेल्या वाहनांबाबत संपूर्ण माहिती, जप्त करण्यात आलेल्या रोख रक्कम व जुगार साहित्या बाबत खुलासेवार माहीती, पंच,कारवाई करणारे अधिकारी कर्मचारी यांची माहीती, स्टेशन डायरी-रोजनामा, सीसीटीव्ही चित्रीकरण,आरोपी जवळून जप्त केलेल्या मुद्देमालाच्या मालखाना नोंदी,पुढील तपास अधिकारी आदीची मागणी केली असल्याने सदर जुगार प्रकरणाला वेगळेच वळण आले असुन सदर जुगार प्रकरणात कुठेतरी पाणी मुरल्याच्या चर्चा रंगु लागल्या आहे. माहिती अधिकार अधिनियमात केलेल्या समाजसेवी राजेश खंगारे यांच्या अर्जावर सावनेर पोलीस स्टेशन चे जन माहिती अधिकारी काय माहिती देतात यावर सर्वांचे लक्ष वेधले असुन. माहिती मिळाल्यावर सदर प्रकरण वेगळीच कलाटनी घेणार असल्याच्या चर्चा रंगु लागल्या आहे.

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

बोरूजवाडा येथील न्यू फ्रेंड्स कॉलनी, गजानन मंदिराजवळील एका घरात जुगार सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर सावनेर पोलिसांनी १९ ऑगस्ट रोजी धाड टाकून सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केल्याची माहिती पोलिसांच्या प्रसिद्धीपत्रकातून समोर आली आहे. मात्र या कारवाईत जप्त करण्यात आलेल्या रकमेबाबत आता प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

पोलिसांच्या प्रसिद्धीपत्रकानुसार घटनास्थळावरून ५२ ताशपत्ते, रोख रक्कम १,३२,७५० तीन मोटारसायकली, दोन अँड्रॉइड मोबाईल व इतर साहित्य जप्त करण्यात आले असून, या सर्व मुद्देमालाची एकूण किंमत २,४२,९५० असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

पोलिसांनी सात आरोपींना ताब्यात घेतल्याचेही प्रेस नोटमध्ये नमूद आहे. या कारवाईसाठी गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाल्यानंतर पोलीस घटनास्थळी पोहोचल्याचे सांगण्यात आले आहे.

मात्र आता या कारवाईतील रोख रकमेची प्रत्यक्ष जप्ती कशी करण्यात आली, घटनास्थळी किती रोकड आढळली, पंचनाम्यात किती रक्कम नमूद आहे आणि मुद्देमाल म्हणून नेमकी किती रक्कम जमा करण्यात आली, याबाबत पारदर्शकता आवश्यक असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

विशेष म्हणजे, या प्रकरणाबाबत चर्चेत असलेली २.५० लाखांच्या आसपासची जप्तीची रक्कम आणि पोलिसांच्या प्रेस नोटमध्ये नमूद असलेली १,३२,७५० रुपयांची रोख रक्कम यामध्ये तफावत दिसून येतो. त्यामुळे केवळ प्रसिद्धी पत्रकावर न थांबता जप्ती पंचनामा, मुद्देमाल पावती आणि न्यायालयात सादर केलेल्या कागदपत्रांमधील नोंदी तपासणे गरजेचे ठरणार आहे.

### कारवाई पारदर्शक : ऋतुजा जाधव

वरील कारवाई संदर्भात सावनेर पोलीस स्टेशन च्या ठाणेदार ऋतुजा जाधव यांच्याशी आमच्या स्थानिक प्रतिनिधींनी वास्तविकता जाणून घेतली असता त्यांनी सांगितले की सदरहू कारवाई ही पुर्ण पणे पारदर्शक व कायदेशीर रित्या करण्यात आली असुन सदर प्रकरणात आलेल्या माहिती अजार्तून मागण्यात आलेली माहीती उपलब्ध असलेली इतंभू माहिती जन माहिती अधिकारी निश्चितच उपलब्ध करुन देतील असे ठामपणे बोलून दाखवले.

# सावनेरात ईद-ए-मिलाद-उन-नबी मिरवणुकीसह साजरी

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**



मिलाद-उन-नबी हा इस्लाममधील सर्वात महत्त्वाच्या सणापैकी एक आहे, जो पैगंबर मुहम्मद यांच्या जन्म आणि जीवनाच्या स्मरणार्थ साजरा केला जातो.

असे मानले जाते की पैगंबर मुहम्मद यांचा जन्म सुमारे ५७० इसवी मध्ये मक्का येथे झाला. त्यांचा जन्म मिलाद-उन-नबीच्या दिवशी, म्हणजेच रबी-उल-अव्वल महिन्याच्या १२ तारखेला झाला. म्हणूनच या दिवसाला ईद-ए-मिलाद म्हटले जाते. इस्लाममध्ये ईद-ए-मिलाद-उन-नबी हा एक अतिशय विशेष दिवस मानला जातो कारण पैगंबर मुहम्मद यांचा जन्म याच महिन्यात झाला होता. ईद-ए-मिलाद-उन-नबी बुधवार, २६ ऑगस्ट रोजी साजरी करण्यात आली.

सकाळपासूनच मुस्लिम बांधवांची घरे आनंदाने भरून गेली होती. या दिवशी लोक ईबादद करतात. पैगंबरांच्या आदर्शांचे स्मरण केले जाते. लोकगीत, शेरो शायरी, कविता आणि संदेशांद्वारे आपल्या कुटुंबाला आणि प्रियजनांना शुभेच्छा देतात. या दिवशी मिरवणुका काढल्या जातात.

या निमित्ताने शहरातील जामा मशीद दिव्यांनी सुंदरपणे सजवण्यात आली होती. प्रियजन, नातेवाईक आणि मित्रांसोबत ईद-ए-मिलाद-उन-नबीच्या शुभेच्छांची देवाणघेवाण करून हा सण आनंदाने साजरा करण्यात आला.

हजारो मुस्लिम बांधवांनी या मिरवणुकीत भाग घेतला, जी होली चौक, बाजार चौक, गांधी चौक, बस स्टँड, बाजार चौक, गडकरी चौक, गांधी चौक बस स्टँड मार्गे शहरातून फिरून जामा मशिदीत समाप्त झाली, जिथे या निमित्ताने शहरात मिठाई वाटण्यात आली. या प्रसंगी, सावनेर पोलीस स्टेशन अधिकारी रितुजा जाधव यांच्या नेतृत्वाखाली सावनेर पोलीस अधिकारी आणि वाहतूक पोलिसांनी विस्तृत व्यवस्था केली होती.

या भव्य कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जामा मशिदीचे इमाम शराफत हुसेन, मौलाना दिलशाद, रोशन इमाम, मुश्ताक अहमद, हाजी रहिमुद्दीन सय्यद, नाझिम शेख, साबिर शेख, जाबिर शेख, छोटू हाजी आसिफ शेख, शफीक सय्यद, शाहरुख शेख, बशीर शेख, शाहिद शेख, (बबलू) सलीम पठाण, सोहेल शेख (बिट्टू), अयाज शेख इत्यादींनी अथक परिश्रम घेतले. जलसा मार्गावर विविध ठिकाणी सरबत आणि मिठाईचे वाटप करण्यात आले.

# वरोऱ्यात शांतता समितीची सभा सणादरम्यान नियमांचे पालन करण्याचे पोलिसांकडून आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा धर्मेंद्र शेरकुरे**



आगामी सणांच्या काळात गणेशोत्सव, ईद, श्रीकृष्ण जन्माष्टमी यासारख्या सणांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या उद्देशाने वरोरा येथील सिद्धिविनायक मंगल कार्यालयात काल २५ ऑगस्ट रोजी मंगळवार ला शांतता समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीला खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार करण देवतळे, जिल्हा पोलिस अधीक्षक आयुष नोपानी, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष बाकल, नगराध्यक्षा अर्चना ठाकरे, उपविभागीय अधिकारी संदीप भस्के, तहसीलदार योगेश कोटकर, उपविभागीय सार्वजनिक बांधकाम अधिकारी अभय लोहे, मुख्याधिकारी सिद्धार्थ मेश्राम, महावितरणचे अधिकारी उपस्थित होते.

वरोरा हे शांतता प्रिय गाव असून गावाची ही परंपरा कायम राहील यासाठी सर्व सण शांततेत पार पाडण्याचे आवाहन करीत खासदार प्रतिभा धानोरकर यांनी पोलीस प्रशासनाने या सणा दरम्यान सामजस्यांची भूमिका घ्यावी असे आवाहन केले सनादरम्यान हस्तक्षेप करण्याचे वेळी आपल्यावर येऊ देऊ नये अशा परिस्थितीत नागरिकांनी सण साजरे करावेत. शांतता समिती गणेश मंडळाचे अध्यक्ष, सचिव व कार्यकर्त्यांनी केलेल्या सूचनांचा सकारात्मक विचार करून त्याचे प्रश्न सोडवण्याचे निर्देश यावेळी आमदार करण देवतळे यांनी दिले.

बैठकीत डिजेचा वापर गणेशोत्सव व विसर्जनाचे नियोजन तसेच विसर्जनाच्या अनुषंगाने शांतता व सुरक्षा सुरक्षितता राखण्याच्या दृष्टीने चर्चा करण्यात आली या सणादरम्यान शांतता व सुरक्षेच्या मुद्द्यावर जिल्हा पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांनी अत्यंत स्पष्ट भूमिका घेत नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले. सण व विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावर चोख पोलीस बंदोबस्त ठेवणे व वाहतुकीचे योग्य नियोजन करण्यावर या बैठकीत चर्चा झाली.

न्यायालयाचे नियम आणि प्रशासकीय मार्गदर्शक तत्वांचे पालन करूनच वाद्य व डीजे चा वापर करण्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले. आगामी सर्व सण जातीय सलोख्याने साजरे करून शहराची शांतता व ऐक्य कायम राखण्याचे आवाहन सर्व उपस्थित आणि यावेळी केले. उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष बाकल यांनी प्रास्ताविक केले तर सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद भस्मे यांनी कार्यक्रमाचे संचालन तर पोलीस निरीक्षक ओमप्रकाश सोनटक्के यांनी सर्वांचे आभार मानले.

## हिरापुर पारधी बेडा येथे चिखलाचे साम्राज्य, विद्यार्थ्यांना करावा लागतोय चिखलातून प्रवास

**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा-धर्मेंद्र शेरकुरे**

पारधी समाजाच्या वाट्याला १८ विश्व दारिद्र्य पुजलेलीच , जिवन जगताना अनेक मोठ्या समस्यांना तोंड देत सामोरे जावे लागते. अशेच



एक गाव वरोरा तालुक्यातील हिरापुर पारधी बेडा या गावात येणे जाण्याकरिता रस्ता आहे. परंतु त्या रस्त्यावर संपूर्ण चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. रस्त्यावरील चिखलातून मार्ग काढून विद्यार्थ्यांना शाळेत जावे लागते अजूनपर्यंत ग्रामपंचायत वाटोडा येथील सरपंच किंवा सचिवांनी या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले नाही. दररोज पारधी शालेय विद्यार्थी याच रस्त्यावरून चिखल तुडवत आगमन करतात रस्त्यावरील चिखलामुळे नागरिकांना पायामध्ये जखमा झालेल्या असून चिखलामुळे संपूर्ण दुर्गंधी पसरलेली आहे. आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत राबविल्या जाणाऱ्या ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना कागदावरच आहे की काय असा प्रश्न तेथील नागरिक करत आहे. प्रकल्प अधिकारी चिमुर, यांनी लवकरात लवकर सिमेंट रस्ता मंजूर करावा अशी मागणी हिरापुर पारधी बेडा वासीयांनी केली आहे.

# वनार्टीकडून पीएच.डी.च्या १७ अतिरिक्त जागांना मंजुरी

## व्हीजेएनटी संशोधक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीचे आर्थिक बळ

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विमुक्त जाती (व्हीजे-ए) तसेच भटक्या जमाती ब, क आणि ड (एनटी-बी, एनटी-सी व एनटी-डी) या प्रवगार्तील पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यासाठी वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी)ने १७ अतिरिक्त अधिछात्रवृत्तीच्या जागांना मंजुरी दिली आहे. संस्थेच्या संचालक मंडळाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. पात्र विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार असून इच्छुक विद्यार्थ्यांनी संबंधित प्रक्रियेचा लाभ घ्यावा, असे आवाहन वनार्टीचे व्यवस्थापकीय संचालक मा. प्रशांत वावगे यांनी केले आहे.

महाज्योतीमार्फत शैक्षणिक वर्ष २०२५ करिता पीएच.डी. अधिछात्रवृत्तीच्या एकूण १०० जागांची जाहिरात यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यापैकी ३५ जागा व्हीजेएनटी प्रवगार्साठी राखीव ठेवण्यात आल्या होत्या. मात्र, वनार्टीची नोंदणी २३ जानेवारी २०२६ रोजी झाल्याने आणि आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये संस्थेस उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद मर्यादित असल्याने यापूर्वी स्वतंत्र जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली नव्हती. दरम्यान, व्हीजेएनटी प्रवगार्तील पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांकडून अधिछात्रवृत्ती उपलब्ध करून देण्याबाबत मोठ्या प्रमाणावर मागण्या व निवेदने प्राप्त झाली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व संशोधनविषयक हिताचा विचार करून संचालक मंडळाने १७ अतिरिक्त जागांना मंजुरी दिली. विशेष म्हणजे, या १७ जागांसाठी वनार्टीकडून स्वतंत्रपणे नव्याने अर्ज मागविण्यात येणार नाहीत.

महाज्योतीकडे शैक्षणिक वर्ष २०२५ करिता प्राप्त झालेल्या पीएच.डी. अधिछात्रवृत्तीच्या अर्जांमधील व्हीजेएनटी प्रवर्गातील पात्र अर्जदारांमधूनच निवड केली जाणार आहे. अर्जांची पडताळणी, पात्रता, प्राधान्यक्रम व निवड प्रक्रिया लागू शासन निर्णय, मार्गदर्शक सूचना व नियमांनुसार केली जाणार असल्याचेही मा. प्रशांत वावगे यांनी सांगितले.

### दरमहा ३७ हजारांपासून विद्यावेतन

मंजूर करण्यात आलेल्या १७ जागांपैकी विज्ञान व तंत्रज्ञान ९, मानव्यविद्या व सामाजिक विज्ञान ४, आंतरविद्याशाखीय अभ्यास २ आणि वाणिज्य व व्यवस्थापन २ अशा जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. अधिछात्रवृत्तीचा कमाल कालावधी पाच वर्षांचा राहणार असून सुरुवातीला दोन वर्षांसाठी कनिष्ठ संशोधन अधिछात्रवृत्ती (जेआरएफ) मंजूर केली जाणार आहे. जेआरएफनंतर त्रिस्तरीय समितीचा अहवाल व उन्नती प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार वरिष्ठ संशोधन अधिछात्रवृत्ती (एसआरएफ) मंजूर केली जाईल. जेआरएफसाठी ३७ हजार रुपये प्रतिमाह, तर एसआरएफसाठी ४२ हजार रुपये प्रतिमाह अधिछात्रवृत्ती दिली जाणार आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना याशिवाय दोन हजार रुपये अतिरिक्त प्रतिमाह देण्यात येणार आहेत. पीएच.डी. नोंदणीच्या तारखेपासून पाच वर्षे किंवा प्रबंध सादर करण्याचा कालावधी यापैकी जो आधी असेल, तो कालावधी अधिछात्रवृत्तीसाठी ग्राह्य राहणार आहे, असल्याचेही मा. प्रशांत वावगे यांनी सांगितले.



### संशोधनाची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध : अतुल सावे

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली व्हीजेएनटी प्रवर्गातील गुणवंत व होतकरू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, संशोधन आणि योग्य मार्गदर्शनाच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. वनार्टीच्या माध्यमातून पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीच्या माध्यमातून आर्थिक पाठबळ मिळणार असून, या संधीचा विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण विभागाचे मंत्री तथा वनार्टीचे अध्यक्ष अतुल सावे यांनी केले.

संशोधन क्षेत्रात गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देतानाच त्यांना आर्थिक अडचणींमुळे शिक्षण व संशोधन थांबवावे लागू नये, यासाठी शासन विविध उपाययोजना करीत आहे. वनार्टीच्या माध्यमातून मंजूर करण्यात आलेल्या अतिरिक्त अधिछात्रवृत्तीच्या जागांमुळे व्हीजेएनटी प्रवर्गातील संशोधक विद्यार्थ्यांना निश्चितच मोठा आधार मिळेल, असा विश्वासही अतुल सावे यांनी व्यक्त केला.

# 'विकसित भारत २०४७'साठी पेन्शनसक्षम समाज उभारण्याचे पीएफआरडीएचे उद्दिष्ट

## विदर्भातील पहिल्या एनपीएस जनजागृती कार्यशाळेत सार्वत्रिक पेन्शन कव्हरेजवर मान्यवरांचा भर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
पेन्शन नियोजन आता केवळ सरकारी कर्मचाऱ्यांपुरते मर्यादित राहिलेले नाही. राष्ट्रीय पेन्शन प्रणाली (एनपीएस) नागरिकांना निवृत्ती नियोजन आणि दीर्घकालीन आर्थिक सुरक्षिततेसाठी सुलभ, लवचिक आणि शिस्तबद्ध पर्याय उपलब्ध करून देते. तसेच चक्रवाढीच्या परिणामामुळे दीर्घकालीन गुंतवणुकीत मोठी वाढ होऊ शकते, असे या जनजागृती कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे, एमएसएमई विकास व सुविधा कार्यालय (एमएसएमई-डीएफओ), नागपूरचे संचालक डॉ. विजय सिरसाठ यांनी सांगितले.

पेन्शन फंड नियामक आणि विकास प्राधिकरण (पीएफआरडीए) यांच्या पुढाकाराने, पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (पीएचडीसीसीआय) आणि असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट (एआयडी) यांच्या सहकार्याने बुधवारी नागपुरातील रामदासपेठ येथील तरुण भारतच्या संस्कृती सभागृहात या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



यावेळी पीएफआरडीएचे डीजीएम इस्माईल सलाम यांनी सांगितले की, २०४७ पर्यंत सार्वत्रिक पेन्शन कव्हरेज सुनिश्चित करून पेन्शनसक्षम समाज निर्माण करण्यासाठी पीएफआरडीए प्रयत्नशील आहे. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा सरकारसोबत सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आले असून, विविध क्षेत्रांमध्ये एनपीएसचा विस्तार करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेत एमएसएमई क्षेत्राचे महत्त्वपूर्ण योगदान लक्षात घेता, या क्षेत्रातील उद्योग आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांपर्यंत एनपीएसचा विस्तार करण्यावर विशेष भर दिला जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

पीएचडीसीसीआय महाराष्ट्रचे सह-अध्यक्ष तथा एआयडीचे मानद सचिव डॉ. विजय कुमार शर्मा यांनी स्वागतपर भाषणात सांगितले की, चार्टर्ड अकाउंटंट्ससाठीही अशाच प्रकारच्या जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल. तसेच जिल्हास्तरावर एमएसएमईमधील कर्मचाऱ्यांपर्यंत एनपीएसचा उपक्रम पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले जातील.

एचडीएफसी सिक्युरिटीजचे ग्रोथ लीडर धवल देसाई, आयसीआयसीआय पेन्शन फंडचे राज्यप्रमुख वैभव द्विवेदी आणि एसबीआय पेन्शन फंडचे रिलेशनशिप मॅनेजर मोहित शर्मा यांनी एनपीएसची रचना, फायदे, लवचिकता आणि विविध गुंतवणूक पर्याय याबाबत मार्गदर्शन केले.

एनपीएस हे शिस्तबद्ध गुंतवणूक, निवृत्ती नियोजन आणि दीर्घकालीन आर्थिक सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे साधन असल्याचे कार्यशाळेत अधोरेखित करण्यात आले. नागरिक तसेच एमएसएमई क्षेत्रातील कर्मचाऱ्यांमध्ये पेन्शनबाबत जनजागृती वाढवून त्याचे व्यापक कव्हरेज सुनिश्चित करण्याची गरजही यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन पीएचडीसीसीआय महाराष्ट्रचे सहाय्यक निवासी संचालक प्रशांत नंदी यांनी केले.

थोडक्यात

## पुनर्विकसित राजीव गांधी विशेष दिव्यांग उद्यानाची आयुक्त डॉ. विपीन यांनी केली पाहणी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
सर्व क्षमतेच्या मुलांना एकत्रितपणे खेळता, शिकता यावे आणि आनंद घेता यावे, या उद्देशाने त्रिमूर्तीनगर राजीव गांधी उद्यानाची येथे पुनर्विकसित करण्यात आलेल्या दिव्यांग उद्यानाची आज (ता.२६) नागपूर महानगरपालिका आयुक्त डॉ. विपीन यांनी पाहणी केली. हे उद्यान विशेषतः विविध गरजा असलेल्या दिव्यांना मुलांसाठी सुरक्षित, सुलभ आणि सर्वसमावेशक वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विकसित करण्यात आले आहे. यावेळी मनपा उपायुक्त गणेश राठोड, लक्ष्मीनगर झोन सहाय्यक आयुक्त धनंजय जाधव, वृक्ष संवर्धक समितीचे अमोल चौरपगार, झोनल अधिकारी ऋषिकेश इंगळे, पेडियाट्रिक थेरपिस्ट असोसिएशन, नागपूर यांची टीम,संकल्प सामाजिक संस्था, डॉ. मीनाक्षी वानखेडे यांच्यासह इतर उस्पथित होते. महापौर निता ठाकरे यांच्या मार्गदर्शनात आणि स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे यांच्या प्रयत्नाने उद्यानामध्ये दिव्यांग मुलांसाठी विशेष स्वरूपातील सुलभ खेळण्याची साधने, ॲक्सेसिबल प्ले एरिया, सेन्सरी प्ले झोन आणि सेन्सरी पाथवे विकसित करण्यात आले आहेत. ऑटिझम, सेरेब्रल पाल्सी तसेच इतर दिव्यांगता असलेल्या मुलांना लक्षात घेऊन या सुविधा तयार करण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रत्येक मुलाला इतर मुलांसोबत खेळण्याचा आणि सामाजिक सहभागाचा समान अनुभव मिळण्यास मदत होणार आहे.

आयुक्त डॉ. विपिन यांनी दिलेल्या निदेर्शानुसार उद्यानातील खेळाची विशेष उपकरणे आणि नव्याने विकसित करण्यात आलेल्या सुविधांचे संरक्षण करण्यासाठी पूर्णवेळ सुरक्षा रक्षकाची नियुक्त करण्यात येणार यावे. तसेच पार्किंग एरिया व अजून विकसित करण्यात येण्यासाठी नवनवीन सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मनपातर्फे २ बसेस देण्यात येणार आहेत. याशिवाय राजीव गांधी उद्यानात खत पिट निर्मिती करणे, उपलब्ध जागेत फूड झोन, बॅडमैंटन हॉल तयार करण्यासाठी मनपा आयुक्त डॉ. विपिन यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

## रुग्णसेवेतून ईद मिलादुन्नबीचा मानवतेचा संदेश



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
ईद मिलादुन्नबीच्या पवित्र पर्वाचे औचित्य साधून जनहित संघर्ष समितीतर्फे ग्रामीण रुग्णालय, उमरेड येथे रुग्णांना फळांचे वितरण करून ईद मिलादुन्नबी साजरी करण्यात आली. सामाजिक बांधिलकी, मानवता आणि बंधुभावाचा संदेश देत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ईद मिलादुन्नबी हा प्रेम, शांतता, करुणा आणि मानवतेचा संदेश देणारा पवित्र दिवस मानला जातो. या भावनेतून जनहित संघर्ष समितीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ग्रामीण रुग्णालयातील विविध वॉर्डमध्ये जाऊन उपचार घेत असलेल्या रुग्णांची आस्थेने विचारपूस केली. रुग्णांना फळांचे वाटप करून त्यांच्या आरोग्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या चेहऱ्यावर या आपुलकीच्या भेटीमुळे समाधानाचे हास्य उमटले.

समाजातील विविध घटकांना सोबत घेऊन सण-उत्सव साजरे करण्याची परंपरा अधिक बळकट व्हावी, तसेच धर्म, जात-पंथाच्या पलीकडे जाऊन माणुसकी हाच खरा धर्म हा संदेश समाजात रुजावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. रुग्णसेवेसारख्या संवेदनशील ठिकाणी सण साजरा करून समितीने सामाजिक एकोपा आणि बंधुभावाचे दर्शन घडविले. या उपक्रमात जैबूनिसाताई शेख, सुरेशजी झुरमुरे, बंडू भाऊ शिंदे, डॉ. पारस शंभरकर, सलीम शेख, जमिलभाई, अझरखान, सुभाष डहाके, कपिल मेश्राम, ईश्वर सावरकर, रेहाना काजी, सफरिया शेख, रफिया, सानिया, कशीश व मानसी सावरकर यांच्यासह जनहित संघर्ष समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. ईद मिलादुन्नबीच्या निमित्ताने रुग्णालयात राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून सेवा, सद्भावना आणि सामाजिक एकतेचा संदेश देण्यात आला. सण केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता तो समाजोपयोगी उपक्रमातून साजरा केल्याने या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## मनसर बिटस्तरीय शिक्षण परिषद संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**
तालुक्यातील मनसर बिटची शिक्षण परिषद प्रोव्हिडन्स इंग्लिश स्कूल मनसर येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या शिक्षण परिषदेचे सुलभक म्हणुन भाषा विषयासाठी सुधाकर कुंभरे आणि गणित विषयासाठी प्रमोद नंदेश्वर यांनी कार्य केले. यावेळी प्रकाश महल्ले केंद्र प्रमुख मनसर व चंद्रशेखर मायवाडे केंद्र प्रमुख नगरधन यांनी शिक्षण परिषदेचे नियोजन व आयोजन केले. मनसर, नगरधन तसेच रामटेक शहर केंद्रातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षण परिषदेत भाषा अंतर्गत मजकूर समृद्ध वातावरण तसेच गणित अंतर्गत गणन पुर्व तयारी विषयांवर ढढळ तसेच शैक्षणिक साहित्यासह कृती व प्रात्यक्षिक येण्यात आली. सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे ही शिक्षण परिषद अत्यंत उत्साहात आणि यशस्वीरीत्या पार पडली.

# विविध स्पर्धांनी रंगला 'महापौर श्रावण उत्सव'

## कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर महानगरपालिकेतर्फे महिलांना त्यांच्या दैनंदिन धकाधकीच्या जीवनातून काही क्षण स्वतःसाठी आनंदाने जगता यावेत, मैत्रिणींसोबत हसता-खेळता यावे आणि महिला सक्षमीकरणाचा संदेश अधिक बळकट व्हावा, या उद्देशाने महापौर श्रावण उत्सव सोहळ्याचे आयोजन राजीव गांधी उद्यान, त्रिमूर्ती नगर येथे आज (ता. २६) उत्साहात करण्यात आले. महापौर निता ठाकरे यांच्या संकल्पनेतून आयोजित या सोहळ्यास महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे, क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड, जलप्रदाय विभाग सभापती दिव्य धुरडे, लक्ष्मीनगर झोन सभापती लक्ष्मी यादव, विधी समिती सभापती कु. निधी तेलगोटे, धरमपेठ झोन सभापती धनश्री देशपांडे, नगरसेविका वर्षा चौधरी, माया हाडे यांच्यासह मनपाचे अधिकारी, माजी नगरसेविका मीनाक्षी तेलगोटे, वर्षा ठाकरे, विशाखा बांते, पल्लवी श्यामकुळे, विनिता दांडेकर, क्रीडा विभागाच्या उज्ज्वला चरडे मनपा कर्मचारी आणि मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे यांनी सांगितले की, श्रावण



महिन्यापासून विविध सण-उत्सवांना सुरुवात होते. त्यामुळे महिलांसाठी काहीतरी वेगळे आणि आनंददायी आयोजन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांना नवी ऊर्जा, नवीन व्यासपीठ आणि आनंद मिळावा, हाच या आयोजनामागील उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

**विविध स्पर्धांनी रंगली श्रावणाची रंगत**

कार्यक्रमात श्रावण क्वीन, फुल राणी, तुझी माझी जोडी आणि रंग माझा हिरवा अशा विविध मनोरंजक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यासोबतच श्रावण गीते, नृत्य, विविध खेळ, फॅशन शो आणि मनोरंजनात्मक उपक्रमांनी कार्यक्रमात चांगलीच रंगत आणली.

यावेळी विना धोटे, दमयंती गोल्हर, गीतांजली बनकर, भारती शेंडे, मानसी बिसेन यांनी विविध स्पर्धांमध्ये बाजी मारली. सर्व विजेत्या महिलांना पैठणी साडी व डिनर सेट देऊन गौरविण्यात आले. या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमय लोखंडे यांनी केले.

## काटोल येथे मिल ईदनिमित्त भव्य रॅली



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**
येथे ईद मिलादुन्नबी भव्य शोभा यात्रेचे रॅली आयोजन बुधवारला पार पडले. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद चंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी लाडू बिस्कुट पॅकेट व फळे वाटून मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद चंद्र पवार चे चंद्रशेखरजी कोल्हे अस्लम खोजा, रा. का अध्यक्ष व बांधकाम सभापती गणेश चन्ने,करीम सर माजी सभापती बाबा शेळके खरेदी विक्री उपसभापती अजय लाडसे, सईदभाई शेख, सेवादल अध्यक्ष नरेंद्र राऊत, सुभाषजी नोरोलिया, अरुणबाबूजी राऊत, रा.का उपाध्यक्ष पंकज मानकर, शब्बीर शेख, नगरसेवक डॉ. अमित काकडे. राका उपाध्यक्ष मुन्ना पटेल, डॉ. राजू कोतेवार, विजय ताटे लव ढोके, नंदू राजुरकर, नेहारे गुरुजी, सावरकर गुरुजी, गणेश सावरकर, संदीप ठाकरे, नाजीम शहा, संजय इंगळे, सुरज मडावी प्रशांत साठोणे, अजित लाडसे, सलीम शेख, संजय कावळे, चेतन उमाठे, बाली शेख, पुष्पक धोतरकर, पुष्कर तिजारे, प्रणव बेलखेडे गौरव ढोबळे, मन्नू मंद्रे, सानिध्य पंचभाई, किशोर धांडे, अजय देशमुख, गणेश पाटील, श्याम बावणे, बबलू शेख, राजिक पठाण व अनेक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

## सिर्सी येथे ईद-ए-मिलाद उत्साहात साजरी, मुख्य रस्त्यावरून रॅली काढून दिला हिंदू-मुस्लिम एकतेचा संदेश

**दै. सिंहवाणी वृत्त, सिर्सी**
मुस्लिम समाजाचा अत्यंत पवित्र आणि आनंदाचा सण 'ईद-ए-मिलाद' (ईद) सिर्सी गावात अत्यंत उत्साहात, शांततेत आणि बंधुभावाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने गावातील मुख्य रस्त्यावरून भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीच्या माध्यमातून गावात सामाजिक सलोखा आणि हिंदू-मुस्लिम एकतेचा दृढ संदेश देण्यात आला.

सणाच्या औचित्याने गावातील मुख्य रस्त्यावर नागरिकांसाठी खाऊ व मिठाईचे वाटप करण्यात आले. सर्वधर्मीय बांधवांनी एकत्र येत एकमेकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

या सोहळ्याला राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी विशेष उपस्थिती दर्शवून ईदच्या शुभेच्छा दिल्या. यामध्ये प्रामुख्याने भाजपा उमरेड ग्रामीण अध्यक्ष मनोज दांदडे, उपसरपंच अतुल नारनवरे, गायकवाड काकाजी, तसेच 'मौलाना मुकद्दस रैयान कमिटी'चे अध्यक्ष शकील खाँ पठाण, उपाध्यक्ष कादरभाई अगवान, सचिव हनिफ मौलाशाह शेख आदींची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच कमिटीचे सदस्य नासीर शेख, नहिम पठाण, जमील तूरक , समसुद्दीन शेख, रेहमान पठाण, अफसर पठाण, एजाज पठाण, समशेर अगवान, मोहम्मद शेख, इब्राहिम कुरेशी, अयुब अगवान, रोशन छव्वारे , आशिक अगवान, जाकीर अगवान , आबिदिन शेख आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या



संख्येने सहभागी झाले होते.

हा उत्सव अत्यंत शांततेत आणि सुव्यवस्थितपणे पार पडावा यासाठी बेला पोलीस ठाण्याचे ठाणेदार उमेश नासरे यांच्या मार्गदर्शनाखाली ए.पी.आय. नितीन देशमुख यांच्या उपस्थितीत चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

सिर्सी पोलीस चौकी इंचार्ज अस्लम नवरगाबांदे, अमोल कोटेवार, ट्रॅफिक इंचार्ज सतीश फुटाणे, अमोल काळे आणि होमगार्ड सलमान पठाण यांनी संपूर्ण रॅलीदरम्यान व गावात चोख व्यवस्था ठेवून सर्व कार्यक्रम अत्यंत शांततेत व शिस्तीत पार पाडले. गावातील या कौतुकास्पद आणि एकतेच्या वातावरणाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# निवडश्रेणी-चटोपाध्यायसह शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर शिक्षक समिती आक्रमक!

## ५ सप्टेंबरपर्यंत मागण्या निकाली काढा; अन्यथा ८ सप्टेंबरला जिल्हा परिषदेसमोर भव्य धरणे आंदोलनाचा इशारा

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजू फुंडे**
जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शिक्षण विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने आक्रमक भूमिका घेतली आहे. शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर ५ सप्टेंबर २०२६पर्यंत सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा ८ सप्टेंबर रोजी जिल्हा परिषद गोंदिया कार्यालयासमोर एकदिवसीय भव्य धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा समितीचे जिल्हाध्यक्ष संदीप तिडके यांनी दिला.

**६ एप्रिलच्या आंदोलनानंतरही प्रश्न प्रलंबित**

शिक्षकांच्या विविध मागण्यांसाठी समितीच्या वतीने ६ एप्रिल २०२६ रोजी बेमुदत साखळी उपोषण आंदोलन करण्यात आले होते. प्रशासनाने लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. मात्र, आश्वासनानंतरही अनेक महत्त्वाचे प्रश्न अद्याप प्रलंबित असून, निवेदने, बैठका आणि सातत्याने पाठपुरावा करूनही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप समितीने केला आहे.

**वेतनश्रेणी व सेवाविषयक लाभांच्या प्रमुख मागण्या**

शिक्षक समितीने प्राथमिक शिक्षकांना एकस्तर पदोन्नतीअंतर्गत र-१४ वेतनश्रेणी लागू करावी, १२ व २४ वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या शिक्षकांना त्यांच्या मूळ नियुक्ती दिनांकापासून चटोपाध्याय व निवडश्रेणीचा लाभ द्यावा, तसेच पदवीधर विषय शिक्षकांना सरसकट पदवीधर वेतनश्रेणीचा लाभ देण्याची मागणी केली आहे.

यासोबतच मागील निवडश्रेणी यादीतून वंचित राहिलेल्या १९ शिक्षकांना तातडीने निवडश्रेणीचा लाभ, आदिवासी उपाययोजनेत नव्याने समाविष्ट गावांना एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ, निवडश्रेणी व चटोपाध्याय वेतनश्रेणीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे, सेवासातत्याची प्रकरणे मार्गी लावणे आणि वैद्यकीय प्रतिपूतीर्ची देयके तातडीने अदा करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**शाळांच्या सुविधांबाबतही मागण्या**

अपुरे पाठ्यपुस्तक मिळालेल्या



शाळांना आवश्यक पुस्तके उपलब्ध करून देणे, अतिरिक्त घरभाडे भत्त्याची प्रलंबित थकबाकी अदा करणे, शिक्षकांचे GPF ऑनलाइन करण्याची प्रक्रिया पूर्ण करणे, तसेच १६व्या वित्त आयोगातून शाळांना आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी समितीने केली आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी आवश्यक वर्गखोल्यांसाठी पुरेसा निधी, तसेच शालेय पोषण आहार योजनेंतर्गत ऋरअक नोंदणी अनिवार्य करू नये, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. सन्माननीय हटिले सर यांच्यावरील अन्याय दूर करून न्याय देण्याची मागणीदेखील समितीने केली आहे.

**आता केवळ आश्वासनांवर समाधान नाही**

शिक्षकांच्या प्रश्नांवर वारंवार निवेदने देऊन, चर्चा करून आणि प्रशासनाकडून आश्वासने घेऊनही प्रश्न मार्गी लागत नसतील, तर आता केवळ आश्वासनांवर समाधान मानले जाणार नाही. शिक्षकांच्या हक्काच्या वेतनश्रेणी, आर्थिक लाभ, सेवाविषयक प्रकरणे आणि शाळांच्या मूलभूत सुविधांबाबत तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे, अशी ठाम भूमिका शिक्षक समितीने मांडली.

या मागण्यांसंदर्भात जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया यांना निवेदन देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे बहुसंख्य पदाधिकारी व शिक्षक बांधव उपस्थित होते.

शिक्षक दिनाच्या शुभपर्वावर शिक्षकांच्या प्रलंबित मागण्या मार्गी लावून गोंदिया जिल्ह्यातील शिक्षकांना जिल्हा परिषदेने शिक्षक दिनाची भेट द्यावी. ५ सप्टेंबरपर्यंत मागण्यांवर सकारात्मक निर्णय न झाल्यास ८ सप्टेंबरला जिल्हा परिषदेसमोर भव्य धरणे आंदोलन करण्यात येईल. शिक्षकांच्या हक्कासाठी सनदशीर व लोकशाही मार्गाने संघर्ष सुरूच राहील. शिक्षकांना न्याय मिळवून दिल्याशिवाय शिक्षक समिती स्वस्थ बसणार नाही.

**– संदीप तिडके**
जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, गोंदिया

थोडक्यात

## रामटेकमध्ये ईद-ए-मिलादुन्नबी साजरी



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

मुस्लिम समाजातील एक पवित्र सण - ईद-ए-मिलादुन्नबी रामटेकमध्ये मुस्लिम समाजामध्ये मोठ्या प्रमाणात बंधुभावाने आणि उत्साहाने साजरी करण्यात आली. इस्लाम धर्माचे संस्थापक हजरत मुहम्मद पैगंबर यांच्या जन्मदिवसानिमित्त ईद-ए-मिलादुन्नबी हा सण मुस्लिम समाजामध्ये मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. सकाळी स्नान करून, नवीन कपडे परिधान करून रामटेक शहराच्या तहसील कार्यालयाजवळ असलेल्या जामा मस्जिद मध्ये मुस्लिम बांधवांनी प्रेमभावनेची शांतीपूर्ण नमाज अदा केली.नंतर एकमेकांना आलिंगन देऊन व "ईद मुबारक" अशा शुभेच्छा देऊन बंधुभाव व्यक्त केला. ईद-ए-मिलादुन्नबीचे औचित्य साधून जामा मस्जिद पासून रामटेक बस स्टॅन्ड, गांधी चौक,अठराभुजा गणेश मंदिर, शांतिनाथ मंदिर या मागार्ने मिरवणूक काढून तिचे समापन जामा मस्जिद मध्ये करण्यात आले. तसेच मिरवणूक मागार्तील विविध ठिकाणी समस्त नागरिकांना मिठाई व शरबतचे वाटप वाटण्यात आले. रामटेक शहरातील विविध जाती आणि धमार्तील ओळखीच्या व्यक्तींना मुस्लिम बांधवांनी प्रत्यक्षपणे आणि अप्रत्यक्षपणे ईदच्या शुभेच्छा दिल्या.

ईद-ए-मिलादुन्नबीच्या या कार्यक्रमास प्रामुख्याने रमेस बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग रामटेक,पोलीस निरीक्षक राजेस थोरात रामटेक उपस्थित होते.त्यांनी मुस्लिम बांधवांना ईद-ए-मिलादुन्नबीच्या शुभेच्छा दिल्या. ईद-ए-मिलादुन्नबी एकाच दिवशी आल्यामुळे रामटेक येथील चौकाचौकात पोलीस बंदोबस्त मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे संपूर्ण कार्यक्रम शांततेत पार पडला. याप्रसंगी मौलाना जुल्फी खाँ अहमद, सुभान शेख, हुसेन भाई मालाधारी, सरदार शेख, फिरोज छव्वारे,सलीम अगवान, अकील कुरेशी, आरिफ मालाधारी, तरबेज कुरेशी, शफि शेख,अकबर छव्वारे, इजाज शेख, सलीम छव्वारे,इसराईल शेख,झकिर कुरेशी, करीम मालाधारी,असलम शेख, आदी मुस्लीम बांधव उपस्थित होते.

## एक पेड मां के नाम : श्री ल. मा. फार्मसी महाविद्यालयाची व्यापक चळवळ



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

वृक्षारोपण अभियान हे केवळ वृक्ष लागवटी पुरते मर्यादित नसून भविष्यातील पर्यावरण संरक्षण, जलसंधारण आणि हवामान बदलाच्या परिणामांना तोंड देण्यासाठी एक व्यापक लोकचळवळ दरवर्षी श्री लक्ष्मणराव मानकर इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी आमगाव येथे वन औषधी वृक्षांची लागवड करून घेण्यात येते. सदर कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमांतर्गत प्रा. श्री जितेंद्र शिवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात आला, त्याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुलसीदास निंबेकर यांनी औषधी उपयोगी वनस्पती व लागवड या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून एकूण २० औषधीयुक्त गुणधर्म असणाऱ्या रोपट्यांची लागवड केली. महाविद्यालयातील अर्बन गार्डन मध्ये विद्यार्थ्यांनी लावलेल्या झाडांबद्दल संस्थेची कार्यवाह श्री केशवराव मानकर व तांत्रिक सल्लागार डॉ. डी.के. संघी यांनी विद्यार्थ्यांचे आभार मानले.

## आमगाव शहरात ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त भव्य रॅलीचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

पैगंबर हजरत मोहम्मद पैगंबरांच्या जन्मदिनानिमित्त मुस्लिम बांधवांकडून आमगाव शहरात ईद-ए-मिलादुन्नबी निमित्ताने भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत विविध मशिदीतील धर्मगुरू, सामाजिक कार्यकर्ते, युवक व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. "एकता, बंधुता आणि शांतता" यांचा संदेश देत रॅलीने शहरातील प्रमुख मागार्ने फेरी मारली. ढोल-ताशांच्या गजरात, फुलांची सजावट केलेल्या वाहनांवर धार्मिक झेंडे फडकवत उत्साहपूर्ण वातावरणात ही रॅली पार पडली.

रॅलीदरम्यान इस्लामी साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच समाजात प्रेम, भाईचारा आणि सौहार्द वाढविण्याचे आवाहन करण्यात आले. पोलिस प्रशासनाने संपूर्ण रॅलीदरम्यान योग्य ती खबरदारी घेत कायदा-सुव्यवस्था सुरळीत राखली. ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त आमगाव शहरात पार पडलेली ही रॅली एकतेचा संदेश देणारी ठरली.

## गणेशमूर्तींसाठी फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य असल्याच्या अफवांवर विश्वास ठेवू नका

**मुंबई :** गणेशमूर्तींसाठी फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात येणार असल्याचे, तसेच गणेशमूर्तीच्या जडणघडणीपासून ते मूतीर्ची मंडळाला डिलिव्हरी होईपर्यंतची संपूर्ण माहिती ठेवणे बंधनकारक करण्यात येणार असल्याचे वृत्त विविध समाजमाध्यमांवर तसेच काही ठिकाणी प्रसारित झाले होते. या संदर्भात समाजमाध्यमांवर प्रसारित होत असलेल्या संदेशांवर अथवा वृत्तांवर नागरिकांनी विश्वास ठेवू नये.

# आशिष जयस्वाल यांच्या हस्ते ७८१ शेतकऱ्यांना सौर कुंपण मशीनचे वाटप

### शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी शासन कटिबद्ध : कृषि राज्यमंत्री आशिष जयस्वाल



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

शेतकऱ्यांचे वन्य प्राण्यांपासून संरक्षण करण्यासाठी आणि मानव - वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी दिनांक २६ ऑगस्ट २०२६ रोजी रामटेक तालुक्यातील कट्टा येथील गोंडवाना सांस्कृतिक भवन येथे आयोजित क्षेत्रीय किसान गोष्टी कार्यक्रमात कृषि राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्या हस्ते ७८१ शेतकऱ्यांना सौर कुंपण मशीनचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी शेतकरी बांधवांशी संवाद साधतांना कृषि राज्यमंत्री जयस्वाल म्हणाले, "रामटेकसारख्या ग्रामीण व आदिवासीबहुल भागात शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन होत असल्याचा मनापासून आनंद आहे.

रामटेक विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना सिंचन, कर्ज, दुष्काळ, वन्यजीव संघर्ष यांसह विविध अडचणींना सामोरे जावे लागते. आमदार असताना आमदार आपल्या गावी उपक्रमाच्या माध्यमातून गावागावात मुक्काम करून या समस्या प्रत्यक्ष अनुभवल्या आहेत. त्यामुळे केवळ समस्या ऐकून न थांबता त्यावर ठोस उपाययोजना करण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे.

मुख्यमंत्री बळीराजा शेतपाणंद रस्ते योजनेचा रामटेक पॅटर्न राज्यभर पोहोचल्याचा अभिमान आहे. मंत्रीपदाची जबाबदारी मिळाल्यानंतर आदिवासी भागातील शेतकऱ्यांसाठी मागेल त्याला बोअरवेल या माध्यमातून सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम सुरू आहे. आदिवासी बांधवांसाठी १०,५१७ घरांना मंजुरी मिळवून दिली असून प्रत्येक गावातील पात्र कुटुंबांना पक्के घर मिळावे यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी फेन्सिंगसोबतच बायो-फेन्सिंगचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन यावेळी केले. शेतकऱ्यांच्या हितासाठी कृषी संवर्धनाच्या विविध योजनांमधून निधी, सिंचन सुविधा, पाणंद रस्ते तसेच इतर आवश्यक उपाययोजना करण्यास शासन कटिबद्ध आहे. धान बोनस आणि कर्जमाफीसंदर्भातही शेतकरी बांधवांनी चिंता करू नये, त्यासाठीही शासनस्तरावर सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. शेतकरी, आदिवासी बांधव आणि सर्वसामान्य जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी तुमचा पहारेकरी म्हणून सरकारमध्ये सातत्याने काम करत आहे.

सर्वांनी एकोप्याने राहून आपल्या गावाचा, तालुक्याचा, मतदारसंघाचा आणि जिल्ह्याचा विकास साधण्यासाठी एकत्रितपणे पुढे जावे, असे आवाहन केले.तसेच पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोलाचे डॉ.विनोद खडसे यांनी पाकांच्या वाढीबाबत तर कृषि संसोधान केंद्र, तारसा येथील डॉ.विद्यासागर बिरादार यांनी पिकांवर येणारे किड व रोगाबाबत उपाययोजना करण्याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास प्रकल्प संचालक आत्मा (नागपूर) अर्चना कडू, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रज्ञा गोळघाटे, तालुका कृषी अधिकारी सुनील कोरटे, उपविभागीय कृषी अधिकारी ग्रीष्मा डेहने, गटविकास अधिकारी जाधव, कट्टाच्या सरपंच वनिता टेकाम, उपसरपंच कट्टा विशाल वरठी, शिवसेना रामटेक तालुका प्रमुख विवेक तुरक, माजी जिल्हा परिषद सदस्य संजय झाडे, माजी पंचायत समिती सभापती संजय नेवारे, माजी पंचायत समिती सभापती चंद्रकांत कोडवते, युवासेना उपजिल्हा प्रमुख कमलेश शरणांगत,शिवसेना उप तालुका प्रमुख देवानंद वंजारी, प्रदीप कोडवते, वडंबा सरपंच मुकेश दुबे, बांद्रा सरपंच कल्पना भलावी, डोंगरताल सरपंच उपेश उईके, पिपरिया सरपंच प्रवीण उइके, विनोद मरसकोल्हे, शिवसेना विभाग प्रमुख आकाश पंधरे,विशाल वरठी, रिजवान पठाण, रामप्रसाद कोकोडे, शिवसेना महिला विभाग प्रमुख स्नेहा वरठी आदी उपस्थित होते.

# तिगाव-जाभूरटोला मार्गावरील पुलावर दोन मोठे खड्डे, दुर्घटनेची टांगती तलवार

### पुलाचा मोठा भाग खचला; लोखंडी सळ्या उघड्या, शालेय बससेवा बंद होण्याची शक्यता, महिनाभरापासून दुरुस्तीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष



**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

आमगाव तालुक्यातील तिगाव ते जांभुरटोला मार्गावरील छोट्या पुलाची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, पुलावर दोन मोठे व खोल खड्डे पडल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पुलाच्या रस्त्यावरील सिमेंटचा थर उखडून लोखंडी सळ्या व जाळी उघडी पडली असून, पुलाचा काही भाग खालून पोकळ झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे एखादे अवजड वाहन या पुलावरून गेल्यास रस्ता आणखी खचून वाहतूक ठप्प होण्याची तसेच मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

गेल्या महिनाभरापासून पुलाची ही अवस्था कायम असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. संबंधित विभागाला पुलाच्या दुरवस्थेबाबत वारंवार माहिती देण्यात आली असूनही अद्याप ठोस दुरुस्ती करण्यात आलेली नाही. परिणामी नागरिक, पालक, विद्यार्थी आणि वाहनचालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

**पुलावर दोन मोठे खड्डे**

काही दिवसांपूर्वी पुलावर एक खड्डा पडला होता. या खड्ड्यातून लोखंडी सळ्या बाहेर आल्या होत्या. मात्र, कालांतराने पुलाची अवस्था अधिकच गंभीर झाली असून आता दोन मोठे व खोल खड्डे पडले आहेत. पुलावरील रस्त्याचा मोठा भाग या खड्ड्यांनी व्यापला आहे. लोखंडी जाळी उघडी पडल्याने वाहनचालकांसाठी हा मार्ग अत्यंत धोकादायक बनला आहे.

**पुलाचा खालचा भाग पोकळ**

पुलाच्या खालच्या भागातील माती व बांधकामाचा काही भाग वाहून गेल्याने हा भाग पोकळ झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे पुलाची संरचनात्मक मजबुती धोक्यात आली आहे. विशेषतः पावसाळ्यात पाण्याचा प्रवाह वाढल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. एखादे जड वाहन पुलावरून गेल्यास खड्ड्याचा आकार वाढून रस्ता खचण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न**

या मार्गावरून परिसरातील अनेक गावांमधील विद्यार्थी शिक्षणासाठी ये-जा करतात. पुलाची धोकादायक अवस्था लक्षात घेता या मार्गावरील शालेय एसटी बससेवा बंद करण्यात येणार असल्याची सूचना विद्यार्थ्यांना देण्यात आल्याची माहिती आहे. बससेवा बंद झाल्यास विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागणार आहे.

**२० किलोमीटर परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाचा मार्ग**

तिगावपासून दोन्ही बाजूंनी सुमारे दहा किलोमीटर परिसरातील अनेक गावांतील नागरिक या मागार्चा नियमित वापर करतात. विद्यार्थी शिक्षणासाठी, नागरिक शासकीय कामांसाठी, तर कामगार व व्यावसायिक रोजगाराच्या निमित्ताने तालुक्याच्या ठिकाणी ये-जा करतात. त्यामुळे हा मार्ग परिसरातील जनतेच्या दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा दुवा आहे. पुलाची वाहतूक बंद झाल्यास या परिसरातील नागरिकांना पर्यायी मार्गाने मोठा वळसा घ्यावा लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुलाची तातडीने दुरुस्ती करणे अत्यावश्यक झाले आहे.

**'निधी नाही'च्या उत्तराने नागरिक संतप्त**

पुलाच्या दुरवस्थेबाबत संबंधित विभागाला गेल्या महिनाभरापासून माहिती देण्यात येत असल्याचे नागरिक सांगतात. मात्र, दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध नसल्याचे उत्तर संबंधित विभागाकडून दिले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

जनतेकडून विविध प्रकारचे कर वसूल केले जात असताना मूलभूत सुविधा आणि सुरक्षित रस्त्यांसाठी निधी उपलब्ध होत नसेल, तर नागरिकांनी कोणाकडे दाद मागायची? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

**दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने जागे होण्याची गरज**

पुलाची सद्यस्थिती पाहता एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतर प्रशासनाने उपाययोजना करण्यापेक्षा त्यापूर्वीच पुलाची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. संबंधित विभागाने तातडीने पुलाची तांत्रिक पाहणी करून धोकादायक भागाची दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिक, पालक, विद्यार्थी आणि वाहनचालकांनी केली आहे.

संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी पुलाची तातडीने दुरुस्ती करावी, तसेच दुरुस्ती पूर्ण होईपर्यंत आवश्यक त्या सुरक्षिततेच्या उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

## कसा होणार 'स्वच्छ, सुंदर बेसा' !





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नवे नागपूर अशी ओळख असलेल्या बेसा, पिपळा, घोगली, बेलतरोडी या भागात विकासकामांचा धडाका सुरू असून कोटींचा निधी विकासकामांवर खर्चला जात आहे. रस्ते, सिवरेल लाईन, उद्यान, पावसाळी नाल्या याचे काम धडाक्यात असतांनाच दुसरीकडे जागोजागी स्वच्छतेचे 'तीनतेरा' वाजत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. काही दिवसांपूर्वीच जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दुचाकीने या भागाची पाहणी केली असता रिकाम्या भुखंडावर तसेच रस्त्याच्या कडेला साचलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांबाबत नाराजी व्यक्त केली होती. मोठमोठ्या इमारतींच्या जाळ्यातील हा भाग वर्तमान परिस्थितीत रिकाम्या भुखंडांवर साचलेले सांडपाणी, या भागात वास्तव्यास असलेल्या मजूर वर्गातील झोपड्यांमधील दैनंदिन गरजांच्या अपुऱ्या व्यवस्थेने त्रस्त असल्याचे निवेदन वामन नगरी येथील रहिवासी आशिष हजारे यांनी बेसा नगर पंचायतचे सभापती जितेंद्र चांदुरकर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. या निवेदनाच्या माध्यमातून त्यांनी परिसरातील रहिवासी नागरिकांच्या भविष्यातील आरोग्य व्यवस्थेबाबतही चिंता व्यक्त केली आहे.

# गीता साने यांच्या कथांमधून सामाजिक वास्तवाचे दर्शन : डॉ. वि. स. जोग

### ग्रंथसहवासतर्फे भावतरंग या विशेष कार्यक्रमाचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

ज्येष्ठ साहित्यिक गीता साने यांच्या कथांमध्ये सामाजिक वास्तव, स्त्रियांचे प्रश्न आणि सामाजिक विसंगतींचे प्रभावी चित्रण आढळते. त्यांच्या लेखनावर मार्क्सवादी विचारांचा प्रभाव असून, सामान्य माणूस अंतिमतः सत्याच्या बाजूने उभा राहतो, ही भूमिका त्यांनी बहुतांश कथांमधून मांडली, असे मत ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक डॉ. वि. स. जोग यांनी व्यक्त केले.

विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथसहवासतर्फे बुधवारी भावतरंग या विशेष कार्यक्रमाचे आयोजन विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक संकुलातील ग्रंथसहवास येथे करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. वि. स. जोग होते तर प्रमुख वक्त्या डॉ. स्वाती धर्माधिकारी, विदर्भ साहित्य संघाच्या कोषाध्यक्ष माधुरी साकुळकर आणि ग्रंथालय संचालिका स्वाती मोहरीर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मराठीच्या व्याकरणतज्ज्ञ व अभ्यासिका डॉ. यास्मिन शेख यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

डॉ. जोग यांनी गीता साने यांच्या साहित्यप्रवासाचा आढावा घेताना, कायाकल्प, स्वातंत्र्याच्या मर्यादा, धनी की ठेवी, मायको दरिद्री आदी कथांमधून सामाजिक वास्तव प्रभावीपणे समोर आल्याचे सांगितले. गीता साने : निवडक कथा या पुस्तकाच्या प्रस्तावनेत डॉ. विनिता हिंगे यांनी २३ कथांचे अभ्यासपूर्ण विश्लेषण केले असून, त्यांच्या साहित्यिक सौंदर्याबरोबरच सामाजिक सामर्थ्याचाही वेध घेतला आहे, असे सांगितले.



गीता साने यांना केवळ स्त्रीवादी लेखिका म्हणून पाहणे अन्यायकारक ठरेल. त्या मूलतः मानवतावादी लेखिका होत्या. स्त्री-शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्वायत्तता, बदलती कुटुंबव्यवस्था, विवाहसंस्था, गरिबी, बेरोजगारी, महागाई आणि पर्यावरण यांसारखे विविध सामाजिक प्रश्न त्यांनी आपल्या कथांमधून मांडले, असे ज्येष्ठ मानसोपचार तज्ज्ञ डॉ. स्वाती धर्माधिकारी यांनी सांगितले.

सोनाली अकोलकर, आभा मुळे, अभिषेक बेल्लारवार आणि स्वर्णिमा प्रकाश यांनी गीता साने यांच्या निवडक कथांचे प्रभावी अभिवाचन केले. अभिवाचनातून कथांमधील भावनिक बारकावे आणि मानवी संवेदनांचे दर्शन उपस्थित रसिकांना घडले. प्रास्ताविक स्वाती मोहरीर यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन मृगा पागे यांनी केले.